विकास व कल्याण

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ,मुंबई.**
**एम.एम.टी.सी. हाऊस, पाचवा मजला, प्लॉट नं. सी २२,**
**ब्लॉक - ई , वांद्रे- कुर्ला संकुल,**
**वांद्रे (पूर्व),मुंबई ४०० ०५१ .**

**मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री, (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ६३ व्या बैठकीचे इतिवृत्त**

*******

**बैठक स्थळ :- मा. मंत्री, (कामगार) तथा मा. अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचे दालन क्र.८४, जॉली मेकर ०१ प्रिमायसेस को. ऑप. सोसायटी लि., आठवा मजला, नरीमन भवन प्लॉट क्र.९५,९६ व ९७, कफ परेड, कुलाबा, मुंबई- ४०० ००२.**

**दिनांक. :- ०७.१०.२०२५ (मंगळवार)**

**वेळ :- दुपारी ३.०० वा.**

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ६३ वी बैठक मंगळवार, दि. ०७.१०.२०२५ रोजी दुपारी ३.०० वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीची विषय सूची खालीलप्रमाणे आहे.:-



| अ.क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ०१. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) विकसीत करण्यासाठी नियुक्त संस्था मे. आयटी आय लिमिटेड विथ ऑरसीएस इन्फोटेक प्रा.लि. संस्थेच्या कालावधीचे नुतणीकरण करणेबाबत. | ०६ ते ०९ |
| ०२. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत बांधकाम कामगारांच्या सुविधेकरीता मागणीनुसार अतिरीक्त तालुका सुविधा केंद्रांची स्थापना करणेबाबत विचारविनिमय करणे. | १० ते १७ |
| ०३. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत "बांधकाम कामगार स्थानिक संनियंत्रण समिती" व "बांधकाम कामगार विभागीय संनियंत्रण समिती" गठीत करण्याच्या कार्यवाहीस मान्यता देणे. | १८ ते १९ |
| ०४. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना सुधारीत सुरक्षा संच (Safety Kit) वितरीत करणे या योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रिया, करारनामा व पुरवठा आदेश इ. कार्यवाहीस मान्यता देणे. | २० ते २४ |
| ०५. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना सुधारीत अत्यावश्यक संच (Essential Kit) वितरीत करणे या योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रिया, करारनामा व पुरवठा आदेश इ. कार्यवाहीस मान्यता देणे. | २५ ते २९ |
| ०६. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सन २०२२-२३ वर्षाकरीताच्या कौशल्य वृध्दी कार्यक्रमाअंतर्गत नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांना देण्यात आलेल्या कौशल्य विकास प्रशिक्षण योजनेचा आढावा घेणे तसेच लक्षांकपूर्तीसाठी मुदतवाढ मागणी, वाढीव लक्षांक मागणी व लक्षांक पुनर्वितरण मागणी प्रस्तावांवर विचारविनिमय करणे. | ३० ते ३५ |

| अ.क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ०७. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणा-या कौशल्य विकास कार्यक्रम योजना NSDC मार्फत थेट राबविण्याचा प्रस्तावाबाबत विचारविनिमय करणे. | ३६ ते ३८ |
| ०८. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत तपासणी ते उपचार आरोग्य योजना कार्यान्वित झाल्याने योजनांची व्दिरूक्ती टाळण्यासाठी गंभीर आजाराच्या उपचारार्थ रू. १ लक्ष अर्थसहाय्य व प्रसुती लाभाकरीता देण्यात येणारे अर्थसहाय्य योजना बंद करण्याच्या कार्यवाहीस मान्यता देणे. | ३९ ते ४० |
| ०९. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील मंडळाकडील विविध कल्याणकारी योजनांच्या संगणकीय प्रणाली/पोर्टलचे महाराष्ट्र शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग अंतर्गत RCMS (Ration Card Management System) पोर्टलशी संलग्नीकरण (Integration) करणेबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणे. | ४१ ते ४३ |
| १०. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील शैक्षणिक अर्थसहाय्याच्या योजना महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभाग अंतर्गत SARAL२.० पोर्टलशी संलग्न करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणे. | ४४ ते ४५ |
| ११. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील सन २०२५-२६ मधील माहे एप्रिल -सप्टेंबर या काळात मंडळाच्या गुंतवणूक उपसमितीने अतिरिक्त निधी राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये गुंतवणुक केलेचे कार्यवाहीस मान्यता देणे. | ४६ ते ४७ |
| १२. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या सनदी लेखापाल यांचेकडून तयार व प्रमाणीत केलेल्या "वार्षिक जमा खर्चाच्या लेख्यास" (Annual Account) मंडळाची मान्यता देणे. | ४८ ते ४९ |
| १३. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे प्राप्त अतिरिक्त उपकर परतावा प्रकरणांना मान्यता देणेबाबत. | ५० ते ५५ |
| १४. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील क्र. MH०२ EP ५३११ या वाहनाचे निर्लेखन करून मा. प्रधान सचिव (कामगार) यांचेकरीता नवीन वाहन खरेदीस मान्यता देणे. | ५६ ते ५७ |

| अ.क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १५. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत शासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामाकरीता नियुक्त करणेबाबत मंजुरी देणे. | ५८ ते ५९ |
| १६. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयामध्ये कार्यरत बाह्यस्त्रोत यंत्रणेव्दारे कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन शासन मान्यतेच्या अधिन राहून माहे नोव्हेंबर, २०२५ पर्यंत अदा करण्यास मंडळाची मान्यता देणे. | ६० ते ६१ |
| १७. | माहे मे, २०२५ या कालावधीत आयोजित भुवनेश्वर येथील प्रशासकीय दौऱ्यास व लंडन येथील अभ्यास दौऱ्यास मान्यता देणे. | ६२ ते ६२ |
| १८. | वंसतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाअंतर्गत पैलवान कै. मारूती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळाअंतर्ग नोंदीत व्यक्तीची बांधकाम कामगार म्हणून मंडळात नोंदणी करण्यास मान्यता देणे. | ६३ ते ६४ |
| १९. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विस्तारीत कार्यालयासाठी मे. जॉली मेकर ०१ प्रिमायसेस कॉ. हॉ. सोसायटी लि. यांचेकडील नरीमन भवन, कुलाबा येथील भाडेतत्वावर घेतलेल्या जागेच्या ०३ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढीस मान्यता देणे. | ६५ ते ६६ |
| २०. | मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने आयत्या वेळेचे विषय | ६५ ते ६६ |

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या मंगळवार दिनांक ०७.१०.२०२५ रोजी संपन्न झालेल्या ६३ व्या बैठकीचे इतिवृत्त.

मा. ना. श्री. आकाश फुंडकर, मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ६३ वी बैठक मंगळवार दिनांक ०७.१०.२०२५ रोजी दुपारी ४.०० वा. मा. मंत्री, (कामगार) तथा मा. अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचे दालन क्र.८४, जॉली मेकर ०१ प्रिमायसेस को. ऑप. सोसायटी लि., आठवा मजला, नरीमन भवन प्लॉट क्र.९५,९६ व ९७, कफ परेड, कुलाबा, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य बैठकीस उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. आकाश फुंडकर | मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| २. | मा. श्रीम. आय. ए. कुंदन, प्रधान सचिव (कामगार) | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा. डॉ. एच. पी. तुम्मोड, कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा. श्री. दिपक पोकळे, उप सचिव (कामगार-७) | शासकीय प्रतिनिधी |
| ५. | मा. श्री. विवेक कुंभार | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, मा. प्रधान सचिव, कामगार विभाग मा. कामगार आयुक्त, मंडळ सदस्य या उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संचाच्या प्रती सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आली. तद्नंतर विषयसुचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

**विषय क्र. ०१:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) विकसीत करण्यासाठी नियुक्त संस्था मे. आयटी आय लिमिटेड विथ आरसीएस इन्फोटेक प्रा.लि. संस्थेच्या कालावधीचे नुतणीकरण करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या एकात्मिक कामकाजाचा अंतर्भाव असणारे एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली विकसीत करण्यासाठी ई-निवीदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. सदर ई-निवीदेअंतर्गत खालीलप्रमाणे संस्थांच्या निविदा मंडळ कार्यालयास प्राप्त झालेल्या होत्या.

१. मे. ऑरिओन प्रो सोलूशन लि.

२. मे. आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा. लि.

३. मे. डायनाकॉन्स सिस्टीम अॅन्ड सोलूशन लि.

ई-निवीदा प्रक्रियेअंती मे. आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा. लि.या संस्थेचे दर न्यूनतम असल्याने सदर संस्थेची निवड करण्यात आली. मे.आयटीआय लिमिटेड विथ आरसीअस इन्फोटेक प्रा.लि. यांनी निविदेमध्ये सादर केलेले रू.८९.९३ कोटी ऐवजी रू.८८.६० एवढया रक्कमेत काम करण्यास लेखी संमती दर्शविली होती. त्यासअनुसरून शासन स्तरावरून प्राप्त मान्यतेनुसार मे.आयटीआय लिमिटेड विथ मे.आरसीअस इन्फोटेक प्रा.लि. या संस्थेसोबत दि.०८.०३.२०१९ रोजी करारनामा करण्यात आला. मंडळाचे एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली विकसीत करण्याबाबत दि.०८.०३.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मे.आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा.लि. संस्था यांना पुरवठा आदेश देण्यात आले होते.

कोविड काळात System Requirements Specification (SRS) मंजूरीकरीता विलंब झाल्यामुळे अंमलबजावणीला नियोजित वेळेपेक्षा जास्त विलंब झाला. त्यामुळे कोविड काळात कामगारांच्या कल्याणाकरीता तयार करण्यात आलेली संगणक प्रणाली दि.२३.०७.२०२० रोजी सुरु करण्यात आली.

संगणक प्रणाली सुरू केल्यापासून Manage Service Provider (MSP) ची अंमलबजावणी दि.०८.०३.२०१९ रोजी सुरु करण्यात आली. त्याअनुषंगाने जिल्हा सुविधा केंद्र स्थापन करणेची कार्यवाही सुरू करण्यात आली. IWBMS सुरु झाल्यापासून संगणकप्रणालीव्दारे एकूण नोंदणीकृत झालेल्या बांधकाम कामगारांची संख्या ६८,१०,५६० इतकी आहे. तसेच संगणक प्रणालीव्दारे नुतनीकरण केलेल्या कामगारांची संख्या १३,८२,७१० असून प्रणालीव्दारे लाभाचे एकूण ३५,२३,७७९ अर्ज स्वीकारलेले आहेत. IWBMS मुळे बांधकाम कामगारांना नोंदणी, नुतनीकरण व लाभाच्या वितरणाशी संबंधित मंडळाचे उद्दिष्ट साध्य झाले आहे. सद्यस्थितीत कार्यरत असलेले मे.आरसीएस इन्फोटेक प्रा.लि. यांचे एकात्मिक संगणक प्रणालीबाबतचा कालावधी दि.२२.०७.२०२५ रोजी समाप्त झाला आहे.

मंडळाअंतर्गत विविध कल्याणकारी योजनांचा लाभ नोंदीत (जिवीत) सक्रिय बांधकाम कामगारांना मिळणाकरीता मंडळाकडून तालुका स्तरावर तालुका सुविधा केंद्रांची निर्मिती केली असून सदर एकूण ३७१ कार्यरत तालुका सुविधा केंद्रावर एकात्मिक संगणक प्रणालीची यंत्रणा कार्यान्वित असून सदर तालुका सुविधा केंद्रावर बांधकाम कामगारांच्या नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाच्या अर्जांची व मुळ कागदपत्रांची पडताळणी होत आहे.

सन २०१८ च्या निवीदाप्रक्रीयेतील RFP मधील एकात्मिक संगणक प्रणालीच्या कालावधीबाबत RFP मधील मुद्दा क्र. १३.३०.७ मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे.

**१३.३०.७ Period of Contract**

The Term of the contract shall be for a period of 5 years 6 months from the date of signing of the Agreement that shall include 6 Months of implementation phase and 5 years of Operations & Maintenance phase. However, the Purchaser may choose to extend the Term for a maximum period of another five years in mutual consultations with the MSP with all the terms and conditions of original Agreement.

सदर संस्थेने मंडळास सादर केलेल्या देयकांची परीगणना करून अदा केलेल्या रकमांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**Summary-IWBMS**

| # | Description | Total As per Tender | Actual Material Delivered | Total Payment Received-Arceus | Balance | As per Board Payment Done | Difference |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Hardware | 11,57,53,018 | 10,14,07,341 | 9,12,86,952 | 1,01,20,389 | 91286951.69 | - |
| 2 | Manpower | 32,40,47,000 | 27,27,54,461 | 26,84,03,627 | 43,50,834 | 268403627.1 | - |
| 3 | Travelling Expense | 3,00,00,000 | 2,18,12,500 | 2,14,25,005 | 3,87,495 | 21425005.08 | - |
| 4 | Registration | 11,35,00,000 | 77,29,98,530 | 74,42,74,972 | 2,87,23,558 | 744266120.3 | 8,852 |
| 5 | Renewal | 4,61,78,460 | 7,84,68,770 | 7,58,77,714 | 25,91,057 | 75877707.98 | 6 |
| 6 | Claims | 12,07,15,649 | 10,00,04,853 | 9,38,02,208 | 62,02,645 | 93802207.57 | - |
| 7 | KIT Distribution | - | 15,94,56,661 | 15,94,56,672 | -11 | 159456494 | 178 |
| 8 | Covid Claims | - | 3,04,98,615 | 3,04,98,615 | - | 3,04,98,615 | - |
| 9 | Temporary Registration | - | 48,19,154 | 48,19,154 | - | 48,19,154 | - |
| | **Total** | **75,01,94,127** | **1,54,22,20,884** | **1,48,98,44,918** | **5,23,75,966** | **1,48,98,35,883** | **9,035** |

सद्यस्थितीत मे.आयटी आई लिमिटेड यांना IWBMS प्रणालीच्या अनुषंगाने माहे मे-२०२५ पर्यंतच्या देयकांची अदायगी करण्यात आली आहे. तसेच माहे-जून २०२५ व दि.२२.०७.२०२५ पर्यंत मंडळाचे कामकाज केलेल्या देयकांची पूर्तता करणे प्रलंबित आहे.

**सद्यस्थितीत मंडळामार्फत बांधकाम कामगार नोंदणी, नुतनीकरण व लाभ वितरण संगणक प्रणालीमार्फत सुरू ठेवण्यासाठी खालीलप्रमाणे पर्याय उपलब्ध आहेत.**

**(A) नवीन ई-निविदा प्रक्रिया राबविणे** :- नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबवण्यास लागणारा कालावधी विचारात घ्यावा लागेल. तसेच सदर प्रक्रिया राबवल्यानंतर नव्याने नियुक्त संस्थेमार्फत संगणक प्रणाली देखभाल, नव्याने हार्डवेअर खरेदी इ. बाबतचा अतिरिक्त खर्चही विचारात घ्यावा लागेल.

**(B) मंडळ यंत्रणा** :- सदर कामकाजासाठी मंडळाकडे स्वतंत्र यंत्रणा उपलब्ध नसल्याने मंडळास Project Management Consultancy (PMC) स्वतंत्रपणे तयार करावी लागेल. जिल्हा सुविधा केंद्रामध्ये सद्यस्थितीतील हार्डवेअर यांची दुरूस्ती व देखभाल करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा, त्याकरीता लागणारे मनुष्यबळ तांत्रिक गट (Technical Team), डेटा सेंटर इ. तयार करावे लागेल. सदर बाब खर्चाची आहे.

**(C) मुदतवाढ** :- मे.आयटी आई लिमिटेड यांची यंत्रणा सद्यस्थितीत कार्यान्वित आहे तसेच त्यांनी यापूर्वीच्या मंजूर दरानूसार काम करण्यास सहमती दर्शविली आहे.

सदर संस्थेचा करारनामा कालावधी समाप्त झाला असून दि.२३ जुलै,२०२५ ते दि.२२ ऑक्टोबर, २०२५ या कालावधी पर्यंत संस्था काम सुरु ठेवणार असल्याचे कळविले आहे. त्याबाबत संबंधित संस्था मंडळाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यास तयार असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

RFP मधील अटींच्या अधिन राहून नोंदणी, नुतनीकरण, लाभाच्या व मनुष्यबळ पुरवठा दरांमध्ये कोणताही बदल करता येणार नाही. RFP व करारनामा मंजूर दरांमध्ये कोणताही बदल होणार नाही.

१. मे.आरसीएस इन्फोटेक प्रा.लि. यांना RFP मध्ये नमूद प्रमाणे ०६ मोड्यूल तयार करायचे होते, त्याअनुषंगाने सदर संस्थेकडून ०६ मोड्यूल तयार करण्यात आले असून त्यापैकी सद्यस्थितीमध्ये ०४ मोड्यूल कार्यरत आहेत. उर्वरीत ०२ मोड्यूलची मंडळास करारनामा करतेवेळी आवश्यकता होती, परंतू त्यापैकी एका मोड्यूलची मंडळास आवश्यकता नसल्याने ते कालबाह्य झाले आहेत. तसेच त्यापैकी एका मोड्यूलची मंडळाची आवश्यकता बदलली त्यामुळे मंडळाने या दोन्ही मोड्यूलचा उपयोग केला नाही. तरी मंडळाच्या आवश्यकतेनूसार नवीन ०२ मोड्यूल तयार करून देणे सदर संस्थेस बंधनकारक राहील.

२. सदर संस्थेकडून जिल्हा सुविधा केंद्रामध्ये पुरविलेल्या हार्डवेअर मध्ये मुदतवाढ मिळेपर्यंतच्या कालावधीमध्ये बिघाड झाल्यास दुरुस्ती व देखभालीची सर्व जबाबदारी संबंधित संस्थेची असणार आहे.

३. शासनाचे सरल पोर्टल, सी.एम. डॅशबोर्ड, आपले सरकार पोर्टल, Electronic Ration Card Management System (ERCMS) पोर्टलशी मंडळाची स्वॉफ्टवेअर संलग्नीकृत करण्यासाठी येणारा सर्व खर्चाची जबाबदारी संबंधित संस्थेची असणार आहे.

४. आधार संलग्नीकृत (UIDAI) करण्यासाठी IWBMS संगणक प्रणालीवरील अर्जांचे स्थलांतर आवश्यकतेनुसार Government Community Cloud (GCC) यावर करावे लागणार आहे.

५. मंडळाच्या आवश्यकतेनुसार संगणक प्रणालीमध्ये Updation/Upgradation या सर्व बाबीची पूर्तता सदर संस्थेने विनामूल्य करायची आहे.

६. मंडळामार्फत बांधकाम कामगारांना नोंदणीनंतर स्मार्टकार्ड देण्यात येते, त्या कार्डच्या प्रिंटीगकरीता आवश्यक कार्ड प्रिंटरला लागणारे सर्व साहित्य याची (Consumable) पूर्तता सदर संस्थेमार्फत करण्यात यावी.

७. थर्ड पार्टी ऑपरेशनल ऑडिट: मंडळाचा संगणक प्रणालीकरीता नियुक्त केलेल्या संस्थेने दुस-या संस्थेमार्फत सॉफ्टवेअरचे डेटा, सिस्टीम सिक्युरीटीकरीता आणि संबंधित प्रणाली गुणवत्ता याचे नियमित लेखापरिक्षण करून अहवाल सादर करणे बंधनकराक राहील.

८. मासिक तपासणी अहवाल: मासीक देयकासोबत Operational Inspection Report (OIR) हा संबंधित महीन्यातील जिल्हा सुविधा केंद्रातील एकूण ऑपरेशन कामगिरीच्या तपासणीचा अहवाल संबंधित मासिक देयकासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

९. बांधकाम कामगारांना जाणाऱ्या एसएमएस साठी येणारा सर्व खर्च सदर संस्थेस करावा लागेल.

१०. नोंदणी, नुतनीकरण झाल्यानंतर बांधकाम कामगारांना देण्यात येणारे स्मार्ट कार्ड (QR Based) असणे आवश्यक आहे.

**ठराव क्र. ६३ (१)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) विकसीत करण्यासाठी नियुक्त संस्था मे. आय.टी.आय. लिमिटेड विथ आरसीएस इन्फोटेक प्रा.लि. संस्थेच्या कालावधीचे नुतणीकरण करणेबाबत मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. ०१:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत बांधकाम कामगारांच्या सुविधेकरीता मागणीनुसार अतिरीक्त तालुका सुविधा केंद्रांची स्थापना करणेबाबत विचारविनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाच्या दि.०२.०७.२०२४ रोजीच्या ६० व्या बैठकीत दैनंदिन बांधकाम कामगारांची संख्या वाढत असल्यामुळे तालुका स्तरावरील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपास गती देण्याकरीता तालुका स्तरावर सुविधा केंद्र स्थापन करण्यास व ई-निविदा पध्दतीने संस्था निश्चित करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली होती. दि. १४.१२.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये मंडळातील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाच्या मदतीसाठी तालुका स्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापन करण्याच्या कामासाठी ई-निविदा पध्दतीने कार्यवाही करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. ई-निविदे अंतर्गत मे.आरसीएस इन्फोटेक प्रा.लि. या न्युनत्तम दर धारकाने सादर केलेल्या दरास दि.२४.०३.२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने सदर संस्थेसोबत करारनामा करुन दि.१५.०३.२०२४ रोजी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

मंडळाच्या दि.०२.०७.२०२४, दि. ०९.१०.२०२४ दि.२६.०३.२०२५ रोजीच्या बैठकीतील मान्यतेनुसार आजअखेर ३७२ इतक्या तालुका सुविधा केंद्राचे कामकाज पुर्ण झाले असून सदर सुविधा केंद्र कार्यान्वित आहे.

विविध बांधकाम कामगार संघटना, लोकप्रतिनिधी अतिरीक्त तालुका सुविधा केंद्र स्थापन करणेबाबत मंडळास मागण्या प्राप्त होत आहेत.

तालुका सुविधा केंद्र स्थापनेबाबत ई- निविदेमध्ये अतिरिक्त तालुका सुविधा केंद्राबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

MBOCWW Board intends to setup one Taluka Level Worker Facility Centre in each of ३५८ Taluka in Maharashtra State. However, considering the quantum of construction works and registration of workers, MBOCWW board may increase or decrease number of Taluka Level Worker Facility Centre by २०%.

खालीलप्रमाणे तालुक सुविधा केंद्र स्थापन करणेबाबत मागणी पत्र प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र | कोणाकडून मागणी प्राप्त | मागणी दिनांक | मागणी करण्यात आलेल्या तालुका सुविधा केंद्राचे नाव |
|---|---|---|---|
| ०१. | डॉ. अतुलबाबा भोसले, विधानसभा सदस्य | दि.०३.०२.२०२५ | कराड व पाटण जि.सातारा |
| ०२. | डॉ.अनिल बोंडे, संसद सदस्य | दि.१३.०१.२०२५ | अमरावती, मोर्शी व वरूड जि.अमरावती |

| अ.क्र | कोणाकडून मागणी प्राप्त | मागणी दिनांक | मागणी करण्यात आलेल्या तालुका सुविधा केंद्राचे नाव |
|---|---|---|---|
| ०३. | मा.बापूसाहेब तुकाराम पठारे, विधानसभा सदस्य | दि.०६.०१.२०२५ | येरवडा, जि.पुणे |
| ०४. | श्री.प्रतापसिंह शिवाजीराव कांचन-पाटील शिवस्वराज्य जनरल कामगार संघटना महाराष्ट्र राज्य | निरंक | उत्तर सोलापूर तालुक्यातील बाळे |
| ०५. | श्री.सुधीर पाटोळे, शिवसेना कागल तालुका प्रमुख | निरंक | हमिदवाडा, जि. कोल्हापूर |
| ०६. | मा.श्री.मनोहर माळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | निरंक | सांगली जिल्हयामध्ये तासगाव |
| ०७. | सौ.विश्राती गजानन जाधव | निरंक | इस्लामपूर |
| ०८. | सहाय्यक कामगार आयुक्त सोलापूर यांचे कडून प्राप्त झालेले पत्र व त्यासोबत प्राप्त झालेले नरेंद्र गोविंद काळे यांचे निवेदन | - | सोलापूर |
| ०९. | श्री. हसन मुश्रीफ, मा. मंत्री | दि.०८.०१.२०२५ | उत्तूर, ता.आजरा, गडहिंग्लज शहर व कागल शहर |
| १०. | श्री.नाथाजी तुकाराम पाटील, जिल्हाध्यक्ष भाजपा, कोल्हापूर | निरंक | भुदरगड तालुक्यासाठी मुदाळ तिट्टा |
| ११. | मा.खा.श्री.धैयशील संभाजीराव माने लोकसभा सदस्य | दि.१८.०२.२०२५ | इचलकरंजी ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| १२. | मा.आ.श्री. देवेंद्र राजेश कोठे सोलापूर शहर | दि.२८.०१.२०२५ | रामलाल चौक(मुरारजी पेठ), मोदीखाना, लष्क व कर्णिक नगर |
| १३. | मा.आ.श्री.विजय सि.देशमुख सोलापूर शहर उत्तर | दि.२४.१२.२०२४ | दमाणी नगर, बाळीवेस, रविवार पेठ व शेळगी |
| १४. | मा.श्री.शिवेंद्रसिंहराजे भोसले, मंत्री सार्वजनिक बांधकाम विभाग | दि.०३.०२.२०२५ | मल्हारपेठ ता.पाटण |
| १५. | मा.आ.किसन शंकर कथोरे, १३९ मुरबाड विधानसभा क्षेत्र जि.ठाणे | निरंक | अंबरनाथ मध्ये बदलापूर व मुरबाड, कल्याण मध्ये गोवेली |
| १६. | श्री.विजय महादेव जाधव,कोल्हापूर | - | पन्हाळा तालुक्यातील कळे व करवीर तालुक्यातील परीते |
| १७. | मा.श्री.सादिक इसाक इनामदार, राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी | - | सातारा जिल्ह्यामध्ये कराड |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>कोणाकडून मागणी प्राप्त</th><th>मागणी दिनांक</th><th>मागणी करण्यात आलेल्या तालुका सुविधा केंद्राचे नाव</th></tr>
<tr><td>१८.</td><td>मा.श्री. दिनकर तुकाराम पाटील माजी वि.स.स.</td><td>-</td><td>सांगली शहर</td></tr>
<tr><td>१९.</td><td>मा.श्री.समाधान अवताडे वि.स.स.</td><td>-</td><td>मंगळवेढा तालुक्यामध्ये संत चोखामेळा नगर व पंढरपूर तालुक्यामध्ये कासेगाव</td></tr>
<tr><td>२०.</td><td>मा.डॉ.विनय वि कोरे(सावकर) वि.स.स</td><td>-</td><td>कोडोली, ता.पन्हाळा</td></tr>
<tr><td>२१.</td><td>मा.श्री.धैर्यशिल माने, लोकसभा सदस्य</td><td>-</td><td>कोडोली, ता.पन्हाळा</td></tr>
<tr><td>२२.</td><td>मा.श्री.राहुल आवाडे, विधानसभा सदस्य</td><td>-</td><td>इचलकरंजी, जि.कोल्हापूर</td></tr>
<tr><td>२३.</td><td>मा.श्री. गिरीश महाजन(जलसंपदा)</td><td>-</td><td>वरणगांव, जि. जळगांव</td></tr>
<tr><td>२४.</td><td>मा.आ.श्री.शिवाजी पाटील, चंदगड विधानसभा</td><td>-</td><td>ता.चंदगड, जि.कोल्हापूर</td></tr>
<tr><td>२५.</td><td>श्री.नाथाजी तुकाराम पाटील, जिल्हाध्यक्ष भारतीय जनता पार्टी कोल्हापूर</td><td>-</td><td>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>गावाचे नाव</th><th>तालुका</th><th>जिल्हा</th></tr>
<tr><td>१.</td><td>कळे</td><td>पन्हाळा</td><td rowspan="15">कोल्हापूर</td></tr>
<tr><td>२.</td><td>भोगावती</td><td>करवीर</td></tr>
<tr><td>३.</td><td>कुडीत्रे</td><td>करवीर</td></tr>
<tr><td>४.</td><td>सांगरूळ</td><td>करवीर</td></tr>
<tr><td>५.</td><td>राशिवडे बु.</td><td>राधानगरी</td></tr>
<tr><td>६.</td><td>सरवडे</td><td>राधानगरी</td></tr>
<tr><td>७.</td><td>वाळवा बुद्रुक</td><td>राधानगरी</td></tr>
<tr><td>८.</td><td>बिद्री</td><td>कागल</td></tr>
<tr><td>९.</td><td>सेनापती कापशी</td><td>कागल</td></tr>
<tr><td>१०.</td><td>कडग व</td><td>भुदरगड</td></tr>
<tr><td>११.</td><td>पिंपळगाव</td><td>भुदरगड</td></tr>
<tr><td>१२.</td><td>आकुर्डे</td><td>भुदरगड</td></tr>
<tr><td>१३.</td><td>गारगोटी</td><td>भुदरगड</td></tr>
<tr><td>१४.</td><td>पेरणोली</td><td>आजरा</td></tr>
<tr><td>१५.</td><td>उत्तूर</td><td>आजरा</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

| अ.क्र | कोणाकडून मागणी प्राप्त | मागणी दिनांक | मागणी करण्यात आलेल्या तालुका सुविधा केंद्राचे नाव |
|---|---|---|---|
| | | | १६. नेसरी गडहिंग्लज<br>१७. कडगाव गडहिंग्लज |
| २६. | मा.आ.मंगेश रमेश चव्हाण वि.स.स | दि.१३.०१.२०२५ | चाळीसगाव |
| २७. | प्रा.श्री.रमेश नानासाहेब पा. बोरनारे, विधानसभा सदस्य-वैजापूर,छत्रपती संभाजीनगर | दि.२३.०१.२०२५ | वैजापूर तालुका छत्रपती संभाजीनगर |
| २८. | मा.श्री.संजय सिताराम सावंत, भारतीय जनता पार्टी, कोल्हापूर जिल्हा | दि.२५.०१.२०२५ | करवीर |
| २९. | मा.श्री.सिध्दार्थ प्रकाश मंजेली भारतीय युवा मोर्चा, सरचिटणीस,सोलापूर | दि.११.०२.२०२५ | सोलापूर शहर मध्य |
| ३०. | श्री.सागर तुकाराम चव्हाण | - | सांगली |
| ३१. | मा.श्री.विक्रमसिंह बाळासाहेब पाटणकर(बाबा) पाटण विधानसभा निवडणूक प्रमुख मा.उपाध्यक्ष जिल्हा परिषद सातारा | दि.०४.०२.२०२५ | पाटण तालुका ढेबेवाडी |
| ३२. | सहाय्यक कामगार आयुक्त सोलापूर मार्फत मा.श्री.सुभाष देशमुख विधानसभा सदस्य | दि.२९.०४.२०२५ | निलमनगर |
| ३३. | सहाय्यक कामगार आयुक्त कोल्हापूर मार्फत मा.श्री.धनंजय महाडीक, संसद सदस्य | दि.२८.०१.२०२५ | चंदगड |
| ३४. | अपर कामगार आयुक्त, नागपूर मार्फत पत्र मा.श्री.चंद्रशेखर बावनकुळे महसूल मंत्री | दि.१५.०१.२०२५ | कान्हान नगर परिषद |
| ३५. | अपर कामगार आयुक्त यांचे मार्फत मा.आमदार श्री.संजय केनेकर वि.प.स. | दि.१७.०६.२०२५ | वाळवा व शिराळा जि.सांगली |

| अ.क्र | कोणाकडून मागणी प्राप्त | मागणी दिनांक | मागणी करण्यात आलेल्या तालुका सुविधा केंद्राचे नाव |
|---|---|---|---|
| | | | करकंब ता.पंढरपूर |
| ३६. | मा.आ.श्री.जयकुमार गोरे | दि.१५.०६.२०२५ | बुटीबोरी जि.नागपूर |
| ३७. | अपर कामगार आयुक्त यांचे मार्फत मा.आ.समीर मेघे हिंगणा विधानसभा, नागपूर | दि.२०.०६.२०२५ | |
| ३८. | उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचेमार्फत पत्र दि.२३.०६.२०२५ मा.आ.श्री.चंद्रदीप शशिकांत नरके | दि.२३.०६.२०२५ | बाजारभोगाव, ता.पन्हाळ, जि.कोल्हापूर |
| ३९. | उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचेमार्फत पत्र दि. २८.०१.२०२५ मा.आ.श्री. सदरभाऊ खोत | दि.१३.०५.२०२५ | करकम, ता. पंढरपूर जि.सोलापूर |
| ४०. | उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचेमार्फत पत्र दि.१३.०५.२०२५ मा.आ.सौ.श्वेता महाले | दि.१३.०५.२०२५ | चिखली, जि.बुलढाणा |
| ४१. | उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचेमार्फत पत्र दि. १७.०२.२०२५ मा.आ.श्री.समाधान महादेव आवताडे | दि.१३.०५.२०२५ | पंढरपूर-मंडळवेढा जि.सोलापूर |
| ४२. | उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचेमार्फत पत्र दि. १६.०५.२०२५ मा. मंत्री श्री.प्रकाश आबिटकर | दि.२३.०६.२०२५ | राधानगरी, भुदरगड, आजरा जि.कोल्हापूर |
| ४३. | उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचेमार्फत पत्र दि.२३.०३.२०२५ मा.श्री.विजय सि. देशमुख | दि.२३.०६.२०२५ | दमाणी नगर जि.सोलापूर |
| ४४. | मा.श्री. दिनकर तुकाराम पाटील माजी आमदार सांगली विधानभा. | दि.१५.०५.२०२५ | सांगली शहर जि.सांगली |
| ४५. | मा.मंत्री श्री. शंभुराज देसाई (पर्यटन,खनिकर्म, माजी सैनिक | दि.१७.०६.२०२५ | तळमावले व तारळे ता.पाटण जि.सातारा |

| अ.क्र | कोणाकडून मागणी प्राप्त | मागणी दिनांक | मागणी करण्यात आलेल्या तालुका सुविधा केंद्राचे नाव |
|---|---|---|---|
| | कल्याण) | | |
| ४६. | मा.डॉ.अशोकराव माने विधानसभा सदस्य २७८,हातकणंगले | दि.२३.०६.२०२५ | पेठवडगाव ता. हातकणंगले जि.कोल्हापूर |
| ४७. | मा.सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर राज्यमंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण ,पाणीपुरवठा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम | दि.१७.०४.२०२५ | बोरी ता.जितुर जि.परभणी |
| ४८. | मा.श्री. महेश संभाजीराजे शिंदे, २५७ कोरेगाव विधानसभा सदस्य | दि.२१.०५.२०२५ | जि.सातारा |
| ४९. | मा.श्री. सचिन पंचप्पा कल्याणशेट्टी, सदस्य, अक्कलकोट विधानसभा | दि.०३.०१.२०२५ | मुळेगाव तांडा जि.सोलापूर |
| ५०. | मा.श्री. सत्यजित सरोजिनी शिवाजीराव देशमुख. आमदार,२८४,शिराळा विधानसभा | दि.१३.०५.२०२५ | शेडगेवाडी,कासेगाव ता.शिराळा,जि.सांगली. |
| ५१. | वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार समीती व यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना | दि.२१.०५.२०२५ | मुळेगाव तांडा जि.सोलापूर |
| ५२. | मा.श्री. रविंद्र चव्हाण, कार्यकारी अध्यक्ष भा.ज.पा. महाराष्ट्र प्रदेश यांचे मार्फत पत्र दि.२६.०३.२०२५ मा.श्री. योगेश पुंडलीक टिळेकर आमदार विधान परिषद | दि.०७.०४.२०२५ | कात्रज जि.पुणे |
| ५३. | मा.श्री.चंद्रकांत पाटील , मंत्री उच्च व तंत्रशिक्षण, संसदिय कार्य. यांचे मार्फत पत्र दि.०१.०५.२०२५ मा.श्री. दिनकर तुकाराम पाटील माजी आमदार | दि.२२.०५.२०२५ | सांगली शहर |
| ५४. | आमदार श्री.सदाभाऊ खोत पत्राचे | दि.०३.०३.२०२५ | १) इस्लामपुर ता.वाळवा जि.सांगली |

| अ.क्र | कोणाकडून मागणी प्राप्त | मागणी दिनांक | मागणी करण्यात आलेल्या तालुका सुविधा केंद्राचे नाव |
|---|---|---|---|
| | यांचे दि.०३.०३.२०२५ | | २) शिराळा ता. शिराळा जि.सांगली<br>३) आष्टा ता. वाळवा जि. सांगली<br>४) रिधोरे ता. माढा जि. सोलापूर<br>५) रत्नागिरी ता, जि.रत्नागिरी<br>६) पंढरपूर जि. सोलापूर<br>७) कराड जि. सातारा<br>८) पन्हाळा जि. कोल्हापूर<br>९) चाकण ता.खेड जि. पुणे<br>१०)कासार शिरंबे ता.कराड जि. सातारा |
| ५५. | आमदार, श्री. रवि राणा, | दि.०७.०४.२०२५ | मेलघाट ग्रामीण व अचलपूर ग्रामीण करीता परतवाडा |
| ५६. | मा.श्री. समाधान महादेव आवताडे, दि.०९.०७.२०२५ | दि.०९.०७.२०२५ | मंगळवेढा,सोलापूर |
| ५७. | श्री.शशिकांत किसन चव्हाण | दि.०८.०७.२०२५ | मंगळवेढा, सोलापूर |
| ५८. | मा.आ.श्री. कृष्णा खोपडे | दि.०७.०७.२०२५ | नागपूर (पूर्व) परडी (दोन अतिरिक्त) |
| ५९. | मा.आ.मंगेश रमेश चव्हाण | दि.१८.०७.२०२५ | चाळीसगांव येथे छत्रपती संभाजीनगर चौक |
| ६०. | श्री.सतिश शिवाजीराव काकडे देशमुख | दि.२२.०७.२०२५ | मौजे निंबुत, ता.बारामती, जि.पुणे |
| ६१. | श्री.शशिकांत किसन चव्हाण | दि.०८.०७.२०२५ | मंगळवेढा |
| ६२. | अपर कामगार आयुक्त, नागपूर | दि.२५.०७.२०२५ | बुटीबोरी |
| ६३. | वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार समिती व यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना सोलापूर जिल्हा, | - | मुळेगांव तांडा |
| ६४. | श्री.नितीन अरविंद पोकळे | - | मालेगांव |
| ६५ | मा. प्रविण दटके विधानसभा सदस्य | - | नागपूर- २, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रामध्ये |
| ६६ | मा.सत्यजित देशमुख, विधानसभा सदस्य | - | शिराळा -१ |
| ६७ | मा. राघवेंद्र (रामदादा) पाटील विधानसभा सदस्य, धुळे ग्रामीण विधानसभा | १९.०८.२०२५ | धुळे-१ |
| ६८ | मा.श्री.डॉ.अनिल बोंडे, | २६.०८.२०२५ | अमरावती, मोर्शी व वरूड |

| अ.क्र | कोणाकडून मागणी प्राप्त | मागणी दिनांक | मागणी करण्यात आलेल्या तालुका सुविधा केंद्राचे नाव |
|---|---|---|---|
| ६९ | संसद सदस्य<br>श्री.सतिश शिवाजीराव काकडे देशमुख<br>अध्यक्ष: शेतकरी कृती समिती पुणे जिल्हा | २२.०७.२०२५ | निंबुत ता.बारामती जि.पुणे |
| ७० | महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मुंबई<br>जितेंद्र पाटील- विधी अधिकारी | १४.०७.२०२५ | निलम नगर , सोलापूर |

मंडळाकडे मा. विधानसभा सदस्य, मा. विधानपरिषद सदस्य व मंत्री (कामगार) कार्यालयामार्फत एकुण ११० अतिरीक्त तालुका सुविधा केंद्राची मागणी प्राप्त झाली तथापि, संबंधित ई-निविदेत २०% अतिरीक्त तालुका सुविधा केंद्र स्थापन करण्याची तरतुद आहे. त्यानुसार खालील ४ अतिरीक्त तालुका सुविधा केंद्रे मा.मंत्री तथा अध्यक्ष यांच्या मान्यतेने कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

| अ.क्र. | निवेदनकर्त्याचे नाव | जिल्हा | तालुका |
|---|---|---|---|
| ०१. | मा. प्रविण दटके,विधानसभा सदस्य | नागपूर | नागपूर म.न.पा. क्षेत्र |
| ०२. | मा. प्रविण दटके,विधानसभा सदस्य | नागपूर | नागपूर म.न.पा. क्षेत्र |
| ०३. | मा. राघवेंद्र (रामदादा) भदाने<br>विधानसभा सदस्य,धुळे ग्रामीण विधानसभा | धुळे | धुळे |
| ०४. | मा.सत्यजित देशमुख,विधानसभा सदस्य | सांगली | शिराळा |

उपरोक्त ०४ प्रस्तावास मा.मंत्री तथा अध्यक्ष यांनी मान्यता दिली असून तालुका सुविधा केंद्र स्थापन करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. सदर कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यास विनंती आहे.

**ठराव क्र. ६३ (२)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत नागपूर महानगर पालिका क्षेत्रात - ०२, धुळे व शिराळा येथे प्रत्येकी एक याप्रमाणे ०४ अतिरिक्त तालुका सुविधा केंद्र कार्यान्वित करण्यात आले असून त्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. ०३ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत "बांधकाम कामगार स्थानिक संनियंत्रण समिती" व "बांधकाम कामगार विभागीय संनियत्रण समिती" गठीत करण्याच्या कार्यवाहीस मान्यता देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम १८ अन्वये सन २००७ मध्ये राज्यात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली असून मंडळामार्फत नोंदणी, नुतनीकरण लाभाचे अर्ज सादर करणेकरीता संगणक प्रणाली विकसित करणेत आली आहे. मंडळाअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना आर्थिक सहाय्य, आरोग्य, शैक्षणिक सहाय्य व सामाजिक सुरक्षेच्या विविध कल्याणकारी योजनेचा लाभ देण्यात येतो.

शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दि.२३.०९.२०२१ अन्वये बांधकाम कामगारांची ग्रामिण व शहरी भागात सहजतेने, तत्परतेने व गतीने नोंदणी व्हावी यासाठी इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील कलम १२ (४) प्रमाणे इमारत व इतर बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यासाठी कामगार विभागातील सहा अधिकाऱ्यांना "**नोंदणी अधिकारी**" घोषित करण्यात आले आहेत.

तसेच शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दि.०२.११.२०२१ अन्वये उपरोक्त नमूद नोंदणी अधिकाऱ्यांमध्ये वरिष्ठ कामगार अन्वेषक व कनिष्ठ कामगार अन्वेषक यांचाही समावेश करण्यात आलेला आहे.

बांधकाम कामगारांनी नोंदणी, नुतनीकरण व लाभ मिळणेकरिता अर्ज सादर केल्यावर तालुका बांधकाम कामगार सुविधा केंद्रामार्फत मुळ कागदपत्रांची तपासणी होऊन बायोमॅट्रीक व फोटो घेतल्यानंतर नोंदणी अधिकाऱ्यामार्फत अर्ज मंजूर करणेत येतात. मंडळ कामकाजात सुसुत्रता व पारदर्शकता यावी तसेच नोंदणी,नुतनीकरण व लाभ वाटप प्रक्रिया लोकाभिमुख व्हावी याकरिता खालीलप्रमाणे स्थानिक व विभागीय सनियंत्रण समिती गठीत करण्याची बाब विचाराधीन होती. त्याअनुषंगाने मंडळामार्फत सादर प्रस्तावास अनुसरून दि.०९.०९.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये विधानसभा मतदार संघनिहाय मा. स्थानिक आमदार (विधानसभा सदस्य) यांच्या अध्यक्षतेखाली बांधकाम कामगार स्थानिक संनियंत्रण समिती व मा. मंत्री (कामगार) यांनी शिफारस केलेल्या अध्यक्षतेखाली विभागीय संनियंत्रण समिती स्थापन करण्यात येत आहे. स्थानिक संनियंत्रण समिती समितीचे सदस्य सचिव सहायक कामगार आयुक्त, सरकारी कामगार अधिकारी यांना सदर शासन निर्णयान्वये नोंदणी अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहेत.

**ठराव क्र. ६३ (३)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत बांधकाम कामगार स्थानिक संनियंत्रण समिती" व "बांधकाम कामगार विभागीय संनियंत्रण समिती" गठीत करण्याच्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०४ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना सुरक्षा संच वितरीत करणे या योजनेंतर्गत करण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रिया, करारनामा व पुरवठा आदेश इत्यादी कार्यवाहीस मान्यता देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच पुरवठा करण्याची योजना सन २०१७-१८ पासून राबविण्यात आली होती. सदर योजना शासन पत्र दि.०१.१०.२०२४ अन्वये बंद करण्यात आली आहे. तथापि, उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.३०.११.२०२३ रोजीच्या अधिसूचनेमध्ये मंडळातील नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच पुरवठा करणे ही योजना अधिसूचित करण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे सध्या ४० लाखाहून अधिक नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात आली असून मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांना वितरीत करावयाच्या सुधारित सुरक्षा संच व अत्यावश्यक संच योजना सुरू करणे प्रस्तावित होते. सदर प्रस्तावित योजनेस शासन पत्र दि.१८.०६.२०२५ अन्वये मान्यता प्राप्त झाली असलेने सदर योजनेंतर्गत करण्यात आलेली ई- निविदा मंडळाकडील १० लाख नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच वाटपासाठी प्रक्रिया करारनामा व पुरवठा आदेश कार्यवाहीस मंडळाची मान्यता आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे प्रस्तावित केलेनुसार मंडळाच्या दि.२६.३.२०२५ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

**ठराव क्र.६२ (१९)/२०२५ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना सुधारित सुरक्षा संच व अत्यावश्यक संच योजना सुरू करण्यास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे पारित ठराव व उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दि.०१.१२.२०१६ मधील नमूद अटी व शर्तीनुसार मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना सुरक्षा संच वितरीत करणेबाबतची कार्यवाही ई- निविदा पध्दतीने राबविण्यात आली होती. उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दि.०८.०४.२०२५ रोजीच्या शासन मान्यतेअन्वये गठीत तांत्रिक सिमितीने सुरक्षा संचातील १७ वस्तूंचे Technical Specification करीता मे. एस. एम.बी. एंटरप्रायजेस प्रा.लि. मस्जीद बंदर (प.) मुंबई यांचेकडून प्रत्यक्ष नमुने रू.१३९४२/- दराने खरेदी करण्यात आले व त्यानुसार तांत्रिक समितीने खालील तक्त्यात नमूद प्रमाणे सर्व १७ वस्तूंचे तांत्रिक विनिर्देश (Technical Specification) निश्चित करण्यात आले. ई-निविदेच्या कार्यवाहीअंती मंडळामार्फत सादर केलेल्या प्रशासकीय मंजूरीच्या प्रस्तावास उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने शासन निर्णय क्रमांक इबांका-०६२५/प्र.क्र.८३/काम-७ दि. १८.०६.२०२५ अन्वये मान्यता प्रदान केली आहे. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे पत्रक्र. इबांका-२०१८/प्र.क्र.१३३/काम-७, दिनांक २३.०८.२०१८ अन्वये गठीत तत्कालीन ई- निविदा खरेदी समितीच्या दि.१९.६.२०२५ रोजीच्या बैठकीत निविदा अर्जातील सर्व मुद्दयांवर तांत्रिक व

आर्थिक दृष्टया चर्चा होऊन निविदा अर्ज अंतिम करून शासन मान्यतेस सादर करण्यात आला. त्यास शासनाने दि.२०.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान केली. त्यानुसार सदर ई-निविदेची जाहिरात माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय मुंबई यांचेमार्फत वर्तमानपत्रात शनिवार दि. २१.०६.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली.

सुरक्षा संच वस्तूची आधारभूत किंमतीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | सुरक्षा संच | नग | मूळ दर प्रति नग रू. (कर वगळून) | एकूण दर रू. (कर वगळून) |
|---|---|---|---|---|
| ०१. | Water Bottle Steel | 2 | **105** | **210** |
| ०२. | Steel tiffin Box | 1 | **502.5** | **503** |
| ०३. | Solar Torch | 1 | **572.5** | **573** |
| ०४. | Helmet | 1 | **234** | **234** |
| ०५. | Safety Shoes | 1 | **895** | **895** |
| ०६. | Safety Gloves | 2 | **106.5** | **213** |
| ०७. | Safety Goggle | 1 | **97.5** | **98** |
| ०८. | Reflective Jacket | 2 | **420.5** | **841** |
| ०९. | Mosquito Net | 1 | **317.5** | **318** |
| १०. | Safety Harness | 1 | **2150** | **2150** |
| ११. | Ear Plug | 4 | **13.5** | **54** |
| १२. | Mask | 4 | **27.5** | **110** |
| १३. | Travel Kit Bag | 1 | **417.5** | **418** |
| | **एकूण** | | | **6615** |

दि.२६.०६.२०२५ या विहीत मुदतीअखेर इच्छुक निविदाकारांनी सादर केलेल्या मुद्दयांवर खरेदी समितीच्या दि.३०.०६.२०२५ रोजीच्या प्री- बीड बैठकीत चर्चा करुन अंतिम करण्यात आलेले अभिप्राय (Response) www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आले आहेत. दि.१४.०७.२०२५ सायं. ६.३० पर्यंत या विहीत मुदतीत खालील नमुद इच्छुक निविदाकारांनी सुरक्षा संचाचे Sample Kit व प्रयोगशाळा तपासणीकरीता रू.३.०० लक्ष रक्कमेचे धनाकर्ष मंडळ कार्यालयात सादर केले आहे. दि.१६.०७.२०२५ रोजी दुपारी २.०० या विहीत मुदतीत Technical Bid Opening अंतर्गत www.mahatender.gov.in या संकेतस्थळावरून निविदा सादर केलेल्या खालील तक्त्यात नमूद चार निविदाकारांनी तांत्रिक लिफाफ्यातंर्गत सादर (Upload) केलेली कागदपत्रे डाऊनलोड करण्यात आली.

मंडळ पत्र दि.१८.०७.२०२५ अन्वये उपरोक्त ०४ निविदाकारांनी मंडळाकडे जमा केलेले नमुने (Samples) निविदेच्या परिच्छेद ५.७ मध्ये नमूद तांत्रिक विनिर्देशाप्रमाणे आहेत किंवा कसे हे तपासण्यासाठी सदर नमुन्यांना गोपनीय चिन्हांकीत (Coding) करून मे. सुप्रिटेंडन्स आणि कंपनी मुंबई या शासनमान्य प्रयोगशाळेकडे (शासन निर्णय दि.०१.१२.२०१६ मधील ६.१२ परिशिष्ट १२

मधील मान्यता प्राप्त संस्थेकडे) पाठविण्यात आले. सदर संस्थेकडून दि.०४.०८.२०२५ च्या पत्रान्वये मंडळास दि.०५.०८.२०२५ रोजी सीलबंद तपासणी अहवाल आवक झाला आहे.

दरम्यान उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.३१.०७.२०२५ अन्वये मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध खरेदी प्रक्रियांसाठीच्या खरेदी समितीचे वरील परिच्छेद क्र.०१ मध्ये नमूद प्रमाणे पुर्नगठन करण्यात आले आहे. उद्योग विभागाच्या दि.०१.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद २.९.२ मध्ये नमूद प्रमाणे निविदा सूचना तयार करणे, तपशीलवार वैशिष्टयांना अंतिम स्वरूप देणे, तांत्रिक निविदा उघडणे व छाननी करणे इत्यादी पक्रिया मंडळ कार्यालय आपल्या स्तरावर पार पाडण्याची कार्यवाही करेल आणि पुर्नगठीत समिती खरेदी प्रक्रियेच्या अंतिम टप्प्यासाठी कार्यरत राहील अशी समितीची कार्यकक्षा विहीत करण्यात आली आहे.

मंडळ पत्र दि.१२.०८.२०२५ अन्वये प्रस्तुत ई- निविदेच्या अर्जातील परिच्छेद ०३ Pre-Qualification Documents आणि परिच्छेद ४.५ Envelope A- Technical Proposal मधील नमूद कागदपत्राच्या अनुषंगाने तांत्रिक छाननी करून निविदाकारांना तांत्रिकदृष्टया पात्र व अपात्र घोषित करणेसाठी नव्याने पुनर्गठीत खरेदी समितीची दि.१३.०८.२०२५ रोजी दु. ०२.३० वा. बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीमध्ये चारही निविदाकारांनी त्यांच्या तांत्रिक निविदा लिफाफ्यामध्ये सादर केलेली कागदपत्रे आणि त्यांचे नमुना संच (Samples) प्रयोगशाळा तपासणी अहवाल इत्यादींची निविदा अर्जात विहीत केलेल्या निकषांच्या अनुषंगाने विस्तृत छाननी करून छाननीअंती सर्व चारही निविदाकारांना सर्वानुमते तांत्रिकदृष्टया पात्र असल्याचे घोषित करण्यात आले त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | चिन्हांकन | निविदाकाराचे नाव | Envelope A- Technical Proposal मध्ये सादर कागदपत्रांनुसार पात्रत निर्णय |
|---|---|---|---|
| ०१. | AB | मे. जस्ट युनिव्हर्सल प्रा.लि. | तांत्रिकदृष्टया पात्र |
| ०२. | CD | मे. गुनिना कमर्शिअल प्रा.लि. | तांत्रिकदृष्टया पात्र |
| ०३. | EF | मे. इंडो अलाईड प्रोटीन फूड्स प्रा.लि | तांत्रिकदृष्टया पात्र |
| ०४. | GH | मे. मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड | तांत्रिकदृष्टया पात्र |

तद्नंतर दि.१४.०८.२०२५ रोजी दु. १२.३० वा. चारही निविदाकारांनी सादर केलेल्या दरांच्या निविदा उघडण्यासाठी खरेदी समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये चारही निविदाकारांनी त्यांच्या दरांच्या निविदा लिफाफ्यामध्ये (Commercial Bid-Enevlop- B) सादर केलेल्या दरांनुसार खालीलप्रमाणे तुलनात्मक दरांचा तक्ता तयार करण्यात आला आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | Envelope B- Commercial Bid मध्ये सादर दर (प्रती संच दर रू. वस्तू व सेवाकर वगळून) | शेरा |
|---|---|---|---|
| **०१.** | **मे. जस्ट युनिव्हर्सल प्रा.लि.** | **रू.५,४३७/-** | L1 |
| ०२. | मे. गुनिना कमर्शिअल प्रा.लि. | रू.५,५१६/- | L2 |
| ०३. | मे. इंडो अलाईड प्रोटीन फूड्स प्रा.लि | रू.५,७३४/- | L4 |
| ०४. | मे. मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड | रू.५,७११/- | L3 |

वरीलप्रमाणे मे. जस्ट युनिव्हर्सल्स प्रा.लि. या निविदाकाराने सादर केलेला दर रू.५,४३७/- (अक्षरी- पाच हजार चारशे सदतीस फक्त) कर वगळून प्रती सुरक्षा संच, सर्वात न्यूनत्तम (L1) असून सदरहू दर प्रस्तुत खरेदीच्या आधारभूत किंमत रू.६,६१५/- च्या (-) १७.८०% या अनुज्ञेय मर्यादेत असून मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना सुरक्षा संच वितरीत करणे या ई- निविदेअंतर्गत मे. जस्ट युनिव्हर्सल्स प्रा.लि. या निविदाकाने सादर केलेला रू.५,४३७/- (अक्षरी- पाच हजार चारशे सदतीस फक्त) कर वगळून प्रती सुरक्षा संच या सर्वात न्यूनत्तम (L1) दराचा प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. त्यास शासनाने दि.२०.०८.२०२५ अन्वये मान्यता प्रदान केली आहे.

सुरक्षा संच वितरीत करणे या निविदेच्या निविदा अर्जातील परिच्छेद ४.२१ Notification of Awards आणि ४.२२ Signing of Contract मधील तरतूदीनुसार दर स्विकृती ०३ दिवसांच्या आत व निविदा अर्जातील परिच्छेद ७.१० मध्ये विहीत केलेल्या नमुन्यात मंडळाच्या नावे रू १९.२५ कोटी (अक्षरी एकोणीस कोटी पंचवीस लक्ष) इतक्या रक्कमेची राष्ट्रीयीकृत बँकेची बँक गँरटी मे. जस्ट युनिव्हर्सल प्रा.लि. यांनी खालीलप्रमाणे सादर केली आहे.

| अ.क्र. | सुरक्षा संच संख्या | सुरक्षा अनामत रक्कम (पूर्णांकात) | बँकेचे नाव | सुरक्षा अनामत क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|
| ०१. | १०,००,००० | रू.१९.२५ कोटी | बँक ऑफ इंडिया | ९६६६IPEBG२५०००९ दि.०३.०९.२०२५ |

मे. जस्ट युनिव्हर्सल प्रा.लि. यांनी सादर केलेल्या बँक हमी पत्रानुसार रू.२५,००,००० रक्कमेचे मुद्रांक शुल्क भरणा करून पावती (e-SBTR) मंडळ कार्यालयास सादर केली आहे. त्यानुसार नियुक्त संस्थेसोबत दि.०५.०९.२०२५ अन्वये करारनामा केला आहे व दि.०५.०९.२०२५ रोजी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तरी सदरहू ई- निविदा प्रक्रिया, करारनामा व पुरवठा आदेशाची कार्यवाही मंडळ मान्यतेस्तव सविनय सादर

**ठराव क्र. ६३ (४)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना सुरक्षा संच वितरीत करणे या योजनेंतर्गत करण्यात आलेल्या ई- निविदा प्रक्रिया, करारनामा व पुरवठा आदेश इत्यादी कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०५ :-** **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच वितरीत करणे या योजनेंतर्गत करण्यात आलेल्या ई- निविदा प्रक्रिया, करारनामा व पुरवठा आदेश इत्यादी कार्यवाहीस मान्यता देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच पुरवठा करण्याची योजना सन २०१७-१८ पासून राबविण्यात आली होती. सदर योजना शासन पत्र दि.०१.१०.२०२४ अन्वये बंद करण्यात आली आहे. तथापि, उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.३०.११.२०२३ रोजीच्या अधिसूचनेमध्ये मंडळातील नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच पुरवठा करणे ही योजना अधिसूचित करण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे सध्या ४० लाखाहून अधिक नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात आली असून मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांना वितरीत करावयाच्या सुधारित सुरक्षा संच व अत्यावश्यक संच योजना सुरू करणे प्रस्तावित होते. सदर प्रस्तावित योजनेस शासन पत्र दि.१८.०६.२०२५ अन्वये मान्यता प्राप्त झाली असलेने सदर योजनेंतर्गत करण्यात आलेली ई- निविदा मंडळाकडील १० लाख नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच वाटपासाठी प्रक्रिया करारनामा व पुरवठा आदेश कार्यवाहीस मंडळाची मान्यता आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे प्रस्तावित केलेनुसार मंडळाच्या दि.२६.३.२०२५ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

**ठराव क्र.६२ (१९)/२०२५ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना सुधारित सुरक्षा संच व अत्यावश्यक संच योजना सुरू करण्यास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे पारित ठराव व उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दि.०१.१२.२०१६ मधील नमूद अटी व शर्तीनुसार मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच वितरीत करणेबाबतची कार्यवाही ई- निविदा पध्दतीने राबविण्यात आली होती. उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दि.०८.०४.२०२५ रोजीच्या शासन मान्यतेअन्वये गठीत तांत्रिक समितीच्या कार्यकक्षेतील तरतूदीच्या आधारे बांधकाम कामगारांना अत्यावश्यक वस्तूंचे बाजारात उपलब्ध तांत्रिक विनिर्देश (Technical Specification) चे अनुषंगाने सर्वेक्षण करण्यात आले. त्याकरीता बाजारातून मे.उमर एंटरप्रायजेस मॅन्युफॅक्चरींग अॅन्ड सप्लायर्स, धारावी मुंबई यांचेकडून मंडळ ठरावानुसार निश्चित करण्यात आलेल्या अत्यावश्यक संचातील १७ वस्तूंचे Technical Specification करीता प्रत्यक्ष नमुने रू.१३५८०/- दराने खरेदी करण्यात आले व त्यानुसार तांत्रिक समितीने खालील तक्त्यात नमूद सर्व १७ वस्तूंचे तांत्रिक विनिर्देश (Technical Specification) निश्चित करण्यात आले. ई- निविदेच्या कार्यवाहीअंती मंडळामार्फत सादर केलेल्या प्रशासकीय मंजूरीच्या प्रस्तावास उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने शासन

निर्णय क्रमांक इबांका-०६२५/प्र.क्र.८४/काम-७ दि. १८.०६.२०२५ अन्वये मान्यता प्रदान केली आहे. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे पत्रक्र. इबांका-२०१८/प्र.क्र.१३३/काम-७, दिनांक २३.०८.२०१८ अन्वये गठीत तत्कालीन ई- निविदा खरेदी समितीच्या दि.१९.६.२०२५ रोजीच्या बैठकीत निविदा अर्जातील सर्व मुद्दयांवर तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या चर्चा होऊन निविदा अर्ज अंतिम करून शासन मान्यतेस सादर करण्यात आला. त्यास शासनाने दि.२०.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान केली. त्यानुसार सदर ई- निविदेची जाहिरात माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय मुंबई यांचेमार्फत वर्तमानपत्रात शनिवार दि. २१.०६.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली.

अत्यावश्यक संच वस्तूची आधारभूत किंमतीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | अत्यावश्यक संच | नग | मूळ दर प्रति नग (कर वगळून) | एकूण दर (कर वगळून) |
|---|---|---|---|---|
| १ | Plastic Mat | १ | ४८४ | ४८४ |
| २ | Bedsheet | २ | २८३ | ५६६ |
| ३ | Chaddar | २ | ३७१ | ७४३ |
| ४ | Blanket | २ | ४३७ | ८७४ |
| ५ | Galvanized Trunk | १ | २०१३ | २०१३ |
| ६ | Grain Storage Tank (Kothi) (Capacity २५ Kg) | १ | ६५७ | ६५७ |
| ७ | Grain Storage Tank (Kothi) (Capacity २२ Kg) | १ | ६४४ | ६४४ |
| ८ | Sugar Container (१Kg) (SS २०२) | १ | २४३ | २४३ |
| ९ | Tea Powder Dabba (५०० gms) (SS २०२) | १ | १६३ | १६३ |
| १० | Water Purifier (१२ Ltr) (SS २०२) with Candle | १ | १४९८ | १४९८ |
| | एकूण | | | ७८८४ |

दि.२६.०६.२०२५ या विहीत मुदतीअखेर इच्छुक निविदाकारांनी सादर केलेल्या मुद्दयांवर खरेदी समितीच्या दि.३०.०६.२०२५ रोजीच्या प्री- बीड बैठकीत चर्चा करुन अंतिम करण्यात आलेले अभिप्राय (Response) www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आले आहेत. दि.१४.०७.२०२५ सायं. ६.३० पर्यंत या विहीत मुदतीत खालील नमुद इच्छुक निविदाकारांनी अत्यावश्यक संचाचे Sample Kit व प्रयोगशाळा तपासणीकरीता रू.३.०० लक्ष रक्कमेचे धनाकर्ष मंडळ कार्यालयात सादर केले आहे. दि.१६.०७.२०२५ रोजी दुपारी २.०० या विहीत मुदतीत Technical Bid Opening अंतर्गत www.mahatender.gov.in या संकेतस्थळावरून निविदा सादर केलेल्या खालील तक्त्यात नमूद चार निविदाकारांनी तांत्रिक लिफाफ्यातंर्गत सादर (Upload) केलेली कागदपत्रे डाऊनलोड करण्यात आली.

मंडळ पत्र दि.१८.०७.२०२५ अन्वये उपरोक्त ०४ निविदाकारांनी मंडळाकडे जमा केलेले नमुने (Samples) निविदेच्या परिच्छेद ५.७ मध्ये नमूद तांत्रिक विनिर्देशाप्रमाणे आहेत किंवा कसे हे तपासण्यासाठी सदर नमुन्यांना गोपनीय चिन्हांकीत (Coding) करून मे. सुप्रिटेंडन्स आणि कंपनी मुंबई या शासनमान्य प्रयोगशाळेकडे (शासन निर्णय दि.०१.१२.२०१६ मधील ६.१२ परिशिष्ट १२ मधील मान्यता प्राप्त संस्थेकडे) पाठविण्यात आले. सदर संस्थेकडून दि.०४.०८.२०२५ च्या पत्रान्वये मंडळास दि.०५.०८.२०२५ रोजी सीलबंद तपासणी अहवाल आवक झाला आहे.

दरम्यान उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.३१.०७.२०२५ अन्वये मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध खरेदी प्रक्रियांसाठीच्या खरेदी समितीचे वरील परिच्छेद क्र.०१ मध्ये नमूद प्रमाणे पुर्नगठन करण्यात आले आहे. उद्योग विभागाच्या दि.०१.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद २.९.२ मध्ये नमूद प्रमाणे निविदा सूचना तयार करणे, तपशीलवार वैशिष्टयांना अंतिम स्वरूप देणे, तांत्रिक निविदा उघडणे व छाननी करणे इत्यादी पक्रिया मंडळ कार्यालय आपल्या स्तरावर पार पाडण्याची कार्यवाही करेल आणि पुर्नगठीत समिती खरेदी प्रक्रियेच्या अंतिम टप्प्यासाठी कार्यरत राहील अशी समितीची कार्यकक्षा विहीत करण्यात आली आहे.

मंडळ पत्र दि.१२.०८.२०२५ अन्वये प्रस्तुत ई- निविदेच्या अर्जातील परिच्छेद ०३ Pre-Qualification Documents आणि परिच्छेद ४.५ Envelope A- Technical Proposal मधील नमूद कागदपत्राच्या अनुषंगाने तांत्रिक छाननी करून निविदाकारांना तांत्रिकदृष्टया पात्र व अपात्र घोषित करणेसाठी नव्याने पुनर्गठीत खरेदी समितीची दि.१३.०८.२०२५ रोजी दु. ०२.३० वा. बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीमध्ये चारही निविदाकारांनी त्यांच्या तांत्रिक निविदा लिफाफ्यामध्ये सादर केलेली कागदपत्रे आणि त्यांचे नमुना संच (Samples) प्रयोगशाळा तपासणी अहवाल इत्यादींची निविदा अर्जात विहीत केलेल्या निकषांच्या अनुषंगाने विस्तृत छाननी करून छाननीअंती सर्व चारही निविदाकारांना सर्वानुमते तांत्रिकदृष्टया पात्र असल्याचे घोषित करण्यात आले त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | चिन्हांकन | निविदाकाराचे नाव | Envelope A- Technical Proposal मध्ये सादर कागदपत्रांनुसार पात्रत निर्णय |
|---|---|---|---|
| ०१. | IJ | मे. जस्ट युनिव्हर्सल प्रा.लि. | तांत्रिकदृष्टया पात्र |
| ०२. | KL | मे. इंडो अलाईड प्रोटीन फूड्स प्रा.लि | तांत्रिकदृष्टया पात्र |
| ०३. | MN | मे. गुनिना कमर्शिअल प्रा.लि. | तांत्रिकदृष्टया पात्र |
| ०४. | OP | मे. मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड | तांत्रिकदृष्टया पात्र |

तद्नंतर दि.१४.०८.२०२५ रोजी दु. १२.३० वा. चारही निविदाकारांनी सादर केलेल्या दरांच्या निविदा उघडण्यासाठी खरेदी समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये चारही निविदाकारांनी त्यांच्या दरांच्या निविदा लिफाफ्यामध्ये (Commercial Bid-Enevlop- B) सादर केलेल्या दरांनुसार खालीलप्रमाणे तुलनात्मक दरांचा तक्ता तयार करण्यात आला आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | Envelope B- Commercial Bid मध्ये सादर दर (प्रती संच दर रू. वस्तू व सेवाकर वगळून) | शेरा |
|---|---|---|---|
| | | रू.७,०४३/- | L3 |
| ०१. | मे. जस्ट युनिव्हर्सल प्रा.लि. | **रू.६,७७५/-** | L1 |
| **०२.** | **मे. गुनिना कमर्शिअल प्रा.लि.** | रू. ६,९२५/- | L2 |
| ०३. | मे. इंडो अलाईड प्रोटीन फूड्स प्रा.लि | रू.७,२६८ | L4 |
| ०४. | मे. मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड | | |

वरीलप्रमाणे मे. गुनिना कमर्शिअल प्रा.लि. या निविदाकारांने सादर केलेला दर रू.६,७७५/- (अक्षरी- सहा हजार सातशे पंच्याहत्तर फक्त) कर वगळून प्रती अत्यावश्यक संच, सर्वात न्यूनत्तम (L1) असून सदरहू दर प्रस्तुत खरेदीच्या आधारभूत किंमत रू.७,८८४/- च्या (-) १४.०६% या अनुज्ञेय मर्यादेत आहे. सबब, मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच वितरीत करणे या ई- निविदेअंतर्गत मे. गुनिना कमर्शिअल प्रा.लि. या निविदाकाने सादर केलेला रू६,७७५/- (अक्षरी- सहा हजार सातशे पंच्याहत्तर फक्त) कर वगळून प्रती अत्यावश्यक संच या सर्वात न्यूनत्तम (L1) दराचा प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. त्यास शासनाने दि.२०.०८.२०२५ अन्वये मान्यता प्रदान केली आहे.

अत्यावश्यक संच वितरीत करणे या निविदेच्या निविदा अर्जातील परिच्छेद ४.२१ Notification of Awards आणि ४.२२ Signing of Contract मधील तरतूदीनुसार दर स्विकृती ०३ दिवसांच्या आत व निविदा अर्जातील परिच्छेद ७.१० मध्ये विहीत केलेल्या नमुन्यात मंडळाच्या नावे रू २४.०० कोटी (अक्षरी चौवीस कोटी) इतक्या रक्कमेची राष्ट्रीयीकृत बँकेची बँक गॅरंटी मे. गुनिना कमर्शिअल प्रा.लि यांनी खालीलप्रमाणे सादर केली आहे.

| अ.क्र. | सुरक्षा संच संख्या | सुरक्षा अनामत रक्कम (पूर्णांकात) | बँकेचे नाव | सुरक्षा अनामत क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ०१. | १०,००,००० | रू.२४.०० कोटी | पंजाब नॅशनल बँक | १०५०१ILG००२९२५ |

मे. गुनिना कमर्शिअल प्रा.लि यांनी सादर केलेल्या बँक हमी पत्रानुसार रू.२५,००,००० रक्कमेचे मुद्रांक शुल्क भरणा करून पावती (e-SBTR) मंडळ कार्यालयास सादर केली आहे. त्यानुसार नियुक्त संस्थेसोबत दि.०५.०९.२०२५ अन्वये करारनामा केला आहे व दि.०५.०९.२०२५ रोजी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तरी सदरहू ई- निविदा प्रक्रिया, करारनामा व पुरवठा आदेशाची कार्यवाही मंडळ मान्यतेस्तव सविनय सादर

**ठराव क्र. ६३ (५)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच वितरीत करणे या योजनेंतर्गत करण्यात आलेल्या ई- निविदा प्रक्रिया, करारनामा व पुरवठा आदेश इत्यादी कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

**अध्यक्ष**
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०६:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सन २०२२-२३ वर्षाकरीताच्या कौशल्य वृध्दी कार्यक्रमाअंतर्गत नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांना देण्यात आलेल्या कौशल्य विकास प्रशिक्षण योजनेचा आढावा घेणे तसेच लक्षांकपूर्तीसाठी मुदतवाढ मागणी, वाढीव लक्षांक मागणी व लक्षांक पुनर्वितरण मागणी प्रस्तावांवर विचारविनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, केंद्र शासनाचे दि.२५.०९.२०१८ रोजीचे पत्रान्वये मंडळाअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना गतवर्षीच्या जमा उपकर रकमेच्या १०% पर्यंतच्या मर्यादेत कौशल्य विकास वृद्धीकरण प्रशिक्षणावर खर्च करण्यास शासनमान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार २,१९,८०६ नोंदीत बांधकाम कामगारांना सदर योजनेअंतर्गत शासनमान्य दराने कौशल्य वृध्दी प्रशिक्षण, मुल्यमापन आणि वेतन भरपाई देण्याचे निश्चित करण्यात आले. प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण संस्थांच्या निवडीकरीता माहे ऑगस्ट २०२१ मध्ये मंडळाने शासनाच्या मान्यतेने ई- निविदा पध्दतीने अभिव्यक्ती स्वारस्य (EoI) प्रसिध्द करून १४ प्रशिक्षण संस्थांची निवड करून त्यांचे सोबत करारनामा व कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. तथापि, ०२ प्रशिक्षण संस्थांनी त्यांना वाटप करण्यात आलेला लक्षांक कामकाज करण्यास असमर्थतता दर्शविल्याने त्यांचे कामकाज अन्य प्रशिक्षण संस्थांना पुर्नवितरीत करण्यात आले अशाप्रकारे मंडळाकडील २,१९,८०६ नोंदीत बांधकाम कामगारांना उर्वरीत १२ प्रशिक्षण संस्थांकडून बार बेंडीग, गंवडी काम, सुतार काम, प्लंबींग, रंगकाम, मचाणकाम (Scaffolding) इलेक्ट्रीशीयन व वेल्डर या आठ बांधकाम विषयक कामांचे १५ दिवस (१२० तास) कालावधीचे कौशल्य वृध्दी प्रशिक्षण देण्याचे कामकाज सुरू आहे. सदर प्रशिक्षणाचे मुल्यमापन करण्यासाठी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडील महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई या संस्थेची निवड करण्यात आली असून सदर संस्थेकडून मुल्यमापनाचे कामकाज सूरू आहे. प्रशिक्षणामध्ये ८०% उपस्थितीसह उत्तीर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थी बांधकाम कामगारास रू.४२००/- (प्रति तास रू.३५ X८ तास X १५दिवस) इतकी रक्कम त्याचे वेतन नुकसान भरपाई (Wage Loss) अनुज्ञेय आहे. सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व संबंधीत प्रशिक्षण संस्था, मुल्यामापन संस्था, क्षेत्रिय अधिकारी (नोडल अधिकारी) यांचेकरीता RPL कार्यक्रमाची मानक कार्यपध्दती (SOP) निश्चित करून दि.०९.०९.२०२४ संबंधितांना कळविण्यात आली आहे. त्यानुसार प्रशिक्षण संस्थांनी त्यांना वाटप करण्यात आलेल्या जिल्हानिहाय लक्षांकानुसार प्रशिक्षणाचे कामकाज सुरू केले असून प्रशिक्षणाअंती महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडून मुल्यमापनाचे कामकाज करण्यात येत आहे. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणा-या नोंदीत बांधकाम कामगारांकडून IWBMS प्रणालीवर प्राप्त होणा-या अर्जांनूसार त्यांना वेतन नुकसान भरपाई (Wage Loss) रू.४२००/-

DBT व्दारे हस्तांतरीत करण्यात येत आहे. सदर योजनेच्या कामकाजाचा माहे सप्टेंबर,२०२५ अखेर आढावा घेवून केलेल्या कामकाजास मंडळाची मान्यता आवश्यक आहे.तसेच लक्षांकपूर्तीसाठी मुदतवाढ मागणी, वाढीव लक्षांक मागणी व लक्षांक पुर्नवितरण मागणी प्रस्तावांवर विचारविनिमय करून निर्णय घेणे आवश्यक आहे.

मंडळाकडील कौशल्य वृध्दी कार्यक्रमांअंतर्गत सन २०२२-२३ करीता मंडळाकडील २.१९.८०६ नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांना प्रशिक्षण देण्याकरीता अंतिमत: १२ प्रशिक्षण संस्थांची ई-निविदा प्रक्रियेने अभिव्यक्ती स्वारस्य प्रसिध्द करून निवड करण्यात आली आहे. सदर प्रशिक्षण संस्थाना प्रति बांधकाम कामगार रू.५८८०/-(कर वगळून) प्रशिक्षण शुल्क निश्चित करण्यात आले असून शासन मान्यतेने जिल्हानिहाय प्रशिक्षण लक्षांक वाटप करण्यात आला आहे. सदर संस्थांसोबत दि.२८.११.२०२२ रोजी करारनामा करण्यात आला असून दि.२५.०७.२०२४ अन्वये कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यानुसार माहे सप्टेंबर,२०२५ अखेर प्रशिक्षण कामकाजाचा आढावा खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | प्रशिक्षण संस्थेचे नाव | वाटप करण्यात आलेला प्रशिक्षण लक्षांक | लक्षांक पूर्ती | टक्केवारी(%) |
|---|---|---|---|---|
| १ | मे.स्कील ट्री कन्सटिंग प्रा.लि | ५९,३३७ | ३६,२५१ | ६१.०९ |
| २ | मे. इंडस एडयु ट्रेन प्रा.लि. | ५४,३२५ | ३८,७११ | ७१.२६ |
| ३ | मे.टाईम्स सेंटर फॉर लर्निंग लि | ५४,०८८ | ४,१६८ | ७.७१ |
| ४ | मे. सिमॅसेस लर्निंग एलएलपी | २१,६४० | २४,८७४ | ११४.९४ |
| ५ | मे. पिपल ट्रि, व्हेन्चर प्रा.लि | १७,६८४ | १९,३३१ | १०९.३१ |
| ६ | मे.मोसॅक वर्कस्किल प्रा.लि | ४,३९८ | ३,६२६ | ८२.४५ |
| ७ | मे. युग शक्ती शैक्षणिक एवम सामाजिक विकास संस्था समिती | २,३९६ | २,५४९ | १०६.३९ |
| ८ | मे.पॅलेडीअम कन्सिल्टींग इंडीया प्रा.लि | १,६७७ | २,०३७ | १२१.४७ |
| ९ | मे. भवसार फॅाऊंडेशन | १,४२३ | ८२८ | ५८.१९ |
| १० | मे.जे.आय.टी.एम. स्कील प्रा.लि | १,०४४ | ५२९ | ५०.६७ |
| ११ | मे. एसटेक(AISECT) | ९९३ | ४८५ | ४८.८४ |
| १२ | मे.व्हॅल्युअर फॅबटेक | ८०१ | ८०० | ९९.८८ |
| | **एकूण** | **२,१९,८०६** | **१,३४,१८९** | **६१.०५** |

उपरोक्त तक्त्यात नमूद प्रशिक्षण संस्थांनी प्रशिक्षण दिलेल्या बांधकाम कामगारांपैकी जितके प्रशिक्षणार्थी बांधकाम कामगार मुल्यमापनात उत्तीर्ण होतील तितक्या बांधकाम कामगारांची संख्या प्रशिक्षण लक्षांक म्हणून गणण्यात येणार आहे व त्या संख्येनुसार संबंधित प्रशिक्षण संस्थाना प्रशिक्षण शुल्क अदा करण्यात येणार आहे. मे. सिमॅसेस लर्निंग एलएलपी, मे. पिपल ट्रि, व्हेन्चर प्रा.लि, मे.मोसॅक वर्कस्किल प्रा.लि, मे.युगशक्ती सैक्षणिक एवम व मे.पॅलेडीअम कन्सिल्टींग इंडीया प्रा.लि या प्रशिक्षण संस्थांनी प्रशिक्षणार्थी बांधकाम कामगारांचे मुंल्यमापनास प्रविष्ठ न होणे(Drop Outs),मूल्यमापनात अनुत्तीर्ण (fail) होणे इत्यादी शक्यता विचारात घेऊन मंडळाने नेमून दिलेल्या लक्षांकापेक्षा जास्त प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण दिल्याचे दिसून येते.

प्रशिक्षणाअंती मुल्यमापन करण्यासाठी शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागाअंतर्गत महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई (MSBSVET) या संस्थेची नियुक्ती करण्यात आली असून सदर संस्थेसोबत दि.११.१०.२०२४ रोजी नोंदणीकृत करारनामा करून त्यांना दि.११.०३.२०२५ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. त्यानूसार MSBSVET संस्थेस प्रति लाभार्थी खर्च रू.६००/-(कर वगळून) इतके मुल्यमापन शुल्क अनुज्ञेय करण्यात आले आहे. माहे सप्टेंबर,२०२५ अखेर मुल्यामापन कामकाजाचा आढावा पुढीलप्रमाणे:-

| अ.क्र. | मुल्यमापन संस्थेचे नाव | एकूण प्रशिक्षणार्थी संख्या | मुल्यमापन करण्यात आलेल्या प्रशिक्षणार्थींची संख्या | टक्केवारी(%) |
|---|---|---|---|---|
| ०१. | महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई | २,१९,८०६ | १,१३,०८१ | ५१.४४ |

प्रशिक्षणामध्ये ८०% उपस्थितीसह उत्तीर्ण झालेल्या पात्र प्रशिक्षणार्थी बांधकाम कामगारांनी मंडळाच्या IWBMS प्रणालीवर माहे सप्टेंबर,२०२५ अखेर सादर केलेल्या अर्जांच्या छाननीअंती खालील तक्त्यात नमूद लाभार्थ्यांना वेतन नुकसान भरपाई (Wage Loss) रू.४२००/- या दराने DBT व्दारे हस्तांतरीत करण्यात आली आहे.

| योजनेचे नाव | लाभार्थी संख्या | वेतन नुकसान भरपाई अदा केलेली एकूण रक्कम रू. |
|---|---|---|
| S-०७ RPL कार्यक्रमांतर्गत पात्र प्रशिक्षणार्थींना वेतन नुकसान भरपाई (Wage Loss) देणे | ६,८१० | २,८६,०२,०००/- |

उपरोक्त नमूद १२ प्रशिक्षण संस्थांना दि.२५.०७.२०२४ चे कार्यादेशाव्दारे देण्यात आलेल्या एक वर्षाच्या विहीत मुदतीमध्ये (दि.२४.०७.२०२५ अखेर) त्यांना वाटप करण्यात आलेला प्रशिक्षण लक्षांक पूर्ण होवू शकत नसल्याने खालील तक्त्यात नमूद प्रशिक्षण संस्थांनी त्यांना नेमून दिलेल्या लक्षांकाची पूर्ती करणेसाठी मुदतवाढ मागणी प्रस्ताव सादर केले आहेत.

| अ.क्र. | प्रशिक्षण संस्थेचे नाव | मुदतवाढ मागणी कालावधी |
|---|---|---|
| ०१. | मे. स्कोल ट्री कन्सटिंग प्रा.लि. | दि.३०.११.२०२५ अखेर |
| ०२. | मे. इंडस एडयु ट्रेन प्रा.लि. | दि.३०.११.२०२५ अखेर |
| ०३. | मे.सिमॅसेस लर्निंग एलएलपी | २ महीने |
| ०४. | मे. टाईम्स सेंटर फॉर लर्निंग लि. | ६ महीने |

तसेच सदर १२ प्रशिक्षण संस्थांपैकी ज्या संस्थांचे प्रशिक्षण लक्षांक कामकाज भौतीकदृष्ट्या पूर्ण झाले आहे अशा खालील तक्त्यात नमूद प्रशिक्षण संस्थांनी वाढीव प्रशिक्षण लक्षांकाची मागणी मागणी प्रस्ताव सादर केले आहेत.

| अ.क्र. | प्रशिक्षण संस्थेचे नाव | प्रस्ताव सादर केल्याचा दिनांक |
|---|---|---|
| ०१. | मे. पॅलिडिएम कन्सल्टींग इंडिया प्रा.लि. | दि.०६.०६.२०२५ |
| ०२. | मे.युग शक्ती शैक्षणिक एवम सामाजिक विकास संस्था समिती | दि.२४.०६.२०२५ |
| ०३. | मे.पिपल ट्री वेन्चर प्रा.लि. | दि.९.६.२०२५ |
| ०४. | मे.सिमॅसेस लर्निंग एलएलपी | निरंक |
| ०५. | मे.मोसॅक वर्क्स स्कील प्रा.लि. | दि.०१.०७.२०२५ |
| ०६. | मे.भावसार फाऊंडेशन | दि.२५.०४.२०२५ |
| ०७. | मे. स्कील ट्री कन्सटिंग प्रा.लि. | दि.१८.०८.२०२५ |

उपरोक्त वाढीव लक्षांक मागणीच्या अनुषंगाने ज्या प्रशिक्षण संस्थांकडील कामकाज अद्यापही अपूर्ण आहे अशा प्रशिक्षण संस्थांकडील उर्वरीत लक्षांकापैकी काही लक्षांक ज्या प्रशिक्षण संस्थांची सर्व कामकाज भौतीकदृष्ट्या पूर्ण झालेले आहे अशा प्रशिक्षण संस्थांना पूर्नवितरीत करणेकरीता मंडळ बैठकीत चर्चेअंती निर्णय घेणे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | प्रशिक्षण संस्थेचे नाव | दिलेला लक्षांक | पूर्ण केलेला लक्षांक | उर्वरीत लक्षांक |
|---|---|---|---|---|
| ०१. | मे.स्कील ट्री कन्सटिंग प्रा.लि | ५९,३३७ | ३६,२५१ | २३,०८६ |
| ०२. | मे. इंडस एडयु ट्रेन प्रा.लि. | ५४,३२५ | ३८,७११ | १५,६१४ |
| ०३. | मे.टाईम्स सेंटर फॉर लर्निंग लि | ५४,०८८ | ४,१६८ | ४९,९२० |
| ०४. | मे.मोसॅक वर्कस्किल प्रा.लि | ४,३९८ | ३,६२६ | ७७२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०५. | मे. धावस्मार फाऊंडेशन | १,४२३ | ८२८ | ५९५ |
| ०६. | मे.जे.आय.टी.एम. स्कोल प्रा.लि | १,०४४ | ५२९ | ५१५ |
| ०७. | मे. एस्टेक (AISECT) | ९९३ | ४८५ | ५०८ |

तसेच मे.टाईम्स सेंटर फॉर लर्निंग लि. या प्रशिक्षण संस्थेने त्यांना जिल्हानिहाय नेमून दिलेल्या लक्षांकापैकी खालील तक्त्यात नमुदप्रमाणे आंतरजिल्हा लक्षांक पुनर्वितरण मागणी प्रस्ताव सादर केला आहे.

| अ.क्र. | जिल्हा/WFC | नेमून दिलेला लक्षांक | लक्षांक पुनर्वितरण मागणी |
|---|---|---|---|
| ०१. | कोल्हापूर | ३९,३८४ | ९,३८४ |
| ०२. | इचलकरंजी | ५,६४७ | ५,६४७ |
| ०३. | सातारा | २,५३० | १२,५३० |
| ०४. | अहमदनगर(अहिल्यानगर) | ६,५२७ | २६,५२७ |
| | **एकूण** | **५४,०८८** | **५४,०८८** |

तसेच मे. इंडस एज्युट्रेन या प्रशिक्षण संस्थेने त्यांना जिल्हानिहाय नेमून दिलेल्या लक्षांकापैकी खालील तक्त्यात नमुदप्रमाणे आंतरजिल्हा लक्षांक पुनर्वितरण मागणी प्रस्ताव सादर केला आहे.

| अ.क्र. | जिल्हा/WFC | नेमून दिलेला लक्षांक | लक्षांक पुनर्वितरण मागणी |
|---|---|---|---|
| ०१. | छ. संभाजीनगर | १६३१४ | १६६६० |
| ०२. | जालना | ८००४ | ९२०४ |
| ०३. | नांदेड | ६२५४ | ६२५४ |
| ०४. | परभणी | ५९३० | ५९३० |
| ०५. | बीड | ५२७० | ५२७० |
| ०६. | हिंगोली | २६४९ | २६४९ |
| ०७. | लातूर | २२८१ | ७३५ |
| ०८. | धाराशीव | ६९० | ६९० |
| ०९. | जळगाव | ३६९१ | ३६९१ |
| १०. | धुळे | ३२४२ | ३२४२ |
| | **एकूण** | **५४,३२५** | **५४,३२५** |

तरी,उपरोक्तप्रमाणे मंडळाचे कौशल्य वृध्दी कार्यक्रमांतर्गत सन २०२२-२३ करीता मंडळाकडील २,१९,८०६ नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांना देण्यात येत असलेल्या माहे सप्टेंबर,२०२५ अखेर प्रशिक्षण, मुल्यमापन आणि वेतन भरपाई कामकाजाचा आढावा मंडळाचे मान्यतेस्तव सविनय सादर तसेच मंडळास प्राप्त लक्षांकपूर्तीसाठी मुदतवाढ मागणी, वाढीव लक्षांक मागणी व लक्षांक पुनर्वितरण मागणी प्रस्ताव विचारविनीमयासाठी सादर.

**ठराव क्र. ६३ (६)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सन २०२२-२३ वर्षाकरीताच्या कौशल्य वृध्दी कार्यक्रमाअंतर्गत माहे सप्टेंबर-२०२५ अखेर नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांना देण्यात आलेल्या कौशल्य विकास प्रशिक्षण, मुल्यमापन व वेतन भरपाई कामकाजास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, प्रशिक्षण संस्थांनी सादर केलेल्या लक्षांकपूर्तीसाठी मुदतवाढ मागणी, लक्षांक पुनर्वितरण मागणी व वाढीव लक्षांक मागणी प्रत्येकी १०,००० च्या लक्ष्यांक मर्यादेत मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०७:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणा-या कौशल्य विकास कार्यक्रम योजना NSDC मार्फत थेट राबविण्याचा प्रस्तावाबाबत विचारविनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, केंद्र शासनाचे दि.२५.०९.२०१८ रोजीचे पत्रान्वये मंडळाअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना गतवर्षीच्या जमा उपकर रकमेच्या १०% पर्यंतच्या मर्यादेत कौशल्य विकास वृद्धीकरण प्रशिक्षणावर खर्च करण्याच्या मार्गदर्शक सूचना आहेत. त्यानूसार सन २०२२-२३ करीता मंडळाने शासनमान्यतेनूसार २,१९,८०६ नोंदीत बांधकाम कामगारांना सदर योजनेअंतर्गत शासनमान्य दराने कौशल्य वृध्दी प्रशिक्षण, मुल्यमापन आणि वेतन भरपाई देण्याचे निश्चित करून प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण संस्थांच्या निवडीकरीता माहे ऑगस्ट २०२१ मध्ये शासनाच्या मान्यतेने ई- निविदा पध्दतीने अभिव्यक्ती स्वारस्य (EoI) प्रसिध्द केली व त्याव्दारे १४ प्रशिक्षण संस्थांची निवड करून त्यांचेव्दारे सदर नोंदीत बांधकाम कामगारांना बार बेंडीग, गंवडी काम, सुतार काम, प्लंबींग, रंगकाम, मचाणकाम (Scaffolding) इलेक्ट्रीशीयन व वेल्डर या आठ बांधकाम विषयक कामांचे १५ दिवस (१२० तास) कालावधीचे कौशल्य वृध्दी प्रशिक्षण देण्याचे कामकाज सुरू आहे. सदर प्रशिक्षणाचे मुल्यमापन करण्यासाठी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडील महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई या संस्थेची निवड करण्यात आली आहे. प्रशिक्षणामध्ये ८०% उपस्थितीसह उत्तीर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थी बांधकाम कामगारास रू.४२००/- (प्रति तास रू.३५ X८ तास X १५दिवस) इतकी रक्कम त्याचे वेतन नुकसान भरपाई (Wage Loss) अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाअंतर्गत प्रशिक्षण व मुल्यमापनाचे माहे ऑगस्ट २०२५ अखेर ५० टक्क्यापर्यंत कामकाज पूर्ण झाले आहे.

सध्या मंडळाकडे National skill development corporation (NSDC) संस्थेने ई-मेलव्दारे दि.३०.०६.२०२५ रोजी मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांना थेट त्यांचेमार्फत कौशल्य विकास योजना राबविण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावावर मंडळ बैठकीत चर्चा करणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाचे मार्गदर्शक सूचनांनूसार सन २०२२-२३ करीता मंडळाकडील २१९८०६ नोंदीत बांधकाम कामगारांना कौशल्य विकास वृद्धीकरण योजनेअंतर्गत प्रशिक्षण देण्यासाठी १२ प्रशिक्षण संस्थांची निवड करण्यात आली आहे. सदर प्रशिक्षण संस्थाना प्रति बांधकाम कामगार रू.५८८०/-(कर वगळून) प्रशिक्षण शुल्क निश्चित करण्यात आले असून शासन मान्यतेने जिल्हानिहाय प्रशिक्षण लक्षांक वाटप करण्यात आला आहे. प्रशिक्षणाअंती मुल्यमापन करण्यासाठी शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागाअंतर्गत महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय

शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई (MSBSVET) या संस्थेची नियुक्ती करण्यात आली असून सदर संस्थेस प्रति प्रशिक्षणार्थी खर्च रू.६००/-(कर वगळून) इतके मुल्यमापन शुल्क अनुज्ञेय करण्यात आले आहे. तसेच प्रशिक्षणामध्ये ८०% उपस्थितीसह उत्तीर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थी बांधकाम कामगारास रू.४२००/- (प्रति तास रू.३५ X८ तास X १५दिवस) इतकी रक्कम त्याचे वेतन नुकसान भरपाई (Wage Loss) अनुज्ञेय करण्यात आले आहे. अशाप्रकारे मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या कौशल्य विकास योजने अंतर्गत प्रशिक्षणासाठी रू.५८८०/- प्रति लाभार्थी (कर वगळून) मुल्यमापनासाठी प्रमाणपत्रासह रू.६००/- प्रती लाभार्थी (कर वगळून) असे एकुण रू. ६४८०/- यासह वेतन नुकसान भरपाई रू.४२००/- प्रति लाभार्थी असा एकूण खर्च रु.१०,६८० प्रती लाभार्थी (कर वगळून) इतका येत आहे. सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व संबंधीत प्रशिक्षण संस्था, मुल्यामापन संस्था, क्षेत्रिय अधिकारी (नोडल अधिकारी) यांचेकरीता RPL कार्यक्रमाची मानक कार्यपध्दती (SOP) निश्चित करून कामकाजासाठी स्वतंत्र RPL संगणक प्रणाली विकसीत करण्यात आली आहे. मंडळाकडील माहीती तंत्रज्ञान आधारीत सेवांसाठी नियुक्त केलेल्या सल्लागार संस्थेकडील सल्लागारांमार्फत सदर RPL संगणक प्रणालीचे संनियंत्रण करण्यात येत आहे.

सध्या मंडळाकडे National skill development corporation (NSDC), नवी दिल्ली या संस्थेने मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांना थेट त्यांचेमार्फत कौशल्य विकास योजना राबविण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला व त्यासह मंडळासोबत करावयाच्या करारनामा (MoU) प्रारूप प्राप्त झाले आहे. सदर प्रस्तावातील ठळक बाबी खालीलप्रमाणे-

- सदर करारनाम्याचे अवलोकन केले असता कामकाज व्याप्ती (Scope of Work) (3.2) मध्ये NSDC त्यांच्या भागीदारांसोबत मंडळाकडे नोंदित बांधकाम कामगारांकरीता कौशल्य विकास योजना राबविणार असल्याचे नमूद आहे. सदर योजनेचा कालावधी तीन वर्ष नमूद आहे.
- सदर योजनेकरीता मंडळामार्फत रु.७३ कोटी अग्रीम स्वरुपात देण्यात यावे असे नमूद असून करारनाम्यासोबतच्या परिशिष्ट-२ मध्ये खालीलप्रमाणे बाबी नमूद केल्या आहेत.

| Training Target | Training Cost per candidate (in Rs.) | Assessment & Certification cost per candidate with GST | Total training cost per candidate | Total Training Cost for targeted Candidates |
|---|---|---|---|---|
| १,००,००० | ५८८० | १४२० | ७,३०० | ७३,००,००,००० |

- वरीलप्रमाणे प्रशिक्षणाच्या एकूण दरासह (रु.७३००) यासह वेतन नुकसान भरपाई रु.४२०० यानुसार प्रतिलाभार्थी एकूण खर्च रु.११,५०० इतका होईल. सद्यस्थितीत मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या कौशल्य विकास योजने अंतर्गत प्रति लाभार्थी खर्च रु.१०,६८० इतका आहे.
- करारनामा मसूदयासह संलग्न परिशिष्ट-1 मधील अनु.क्र. ४ मध्ये NSDC व मंडळाच्या सदर योजनेअंतर्गत जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे नमूद आहे.
- ४.२- BOCW Maharashtra-

१) Identify & mobilise registered construction workers for participation

२)Approve training Locations and support local logistics

३)Providing funding for complete training and assessment cost

४) Coordinate with district level stakeholders for effective rollout

५) Ensure validation of candidates and timely disbursement of funds.

सद्या मंडळाकडे सन २०२२-२३ अंतर्गत १२ प्रशिक्षण संस्थांकडून २,१९,८०६ नोंदीत बांधकाम कामगारांना ८ विविध ट्रेडचे १५ दिवस (१२० तास) कौशल्य वृध्दी प्रशिक्षण देण्यात येत असून महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडून सदर प्रशिक्षणार्थींचे मुल्यमापन (Assesment) काम करण्यात येते. सदर कार्यक्रमांतर्गत सद्यस्थितीत ५३.३४% इतके प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. या योजनेअंतर्गत मंडळामार्फत नियुक्त प्रशिक्षण संस्थामार्फत उपरोक्त नमूद कामकाज करण्यात येत असून प्रशिक्षणामधील पास झालेल्या कामगारापोटी प्रशिक्षण खर्च संबंधित संस्थेस देण्यात येतो. आज अखेर प्रशिक्षण घेतलेल्या एकूण कामगारांपैकी १,१७,२३६ इतक्या बांधकाम कामगारांनी यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण केले आहे.तरी मंडळाकडे National skill development corporation (NSDC) संस्थेने मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांना थेट त्यांचेमार्फत कौशल्य विकास योजना राबविण्याबाबतचा सादर केलेला प्रस्ताव विचारविनिमयासाठी सविनय सादर.

**ठराव क्र. ६३ (७)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणा-या कौशल्य विकास कार्यक्रम योजना NSDC मार्फत थेट राबविण्याचा प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०८ :-** **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत तपासणी ते उपचार आरोग्य योजना कार्यान्वित झाल्याने योजनांची व्दिरूक्ती टाळण्यासाठी गंभीर आजाराच्या उपचारार्थ रू. १ लक्ष अर्थसहाय्य व प्रसुती लाभाकरीता देण्यात येणारे अर्थसहाय्य योजना बंद करण्याच्या कार्यवाहीस मान्यता देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राज्यातील नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व त्यांना मंडळाच्या विविध शैक्षणिक सहाय्य योजना, आरोग्य विषय योजना, आर्थिक सहाय्य योजना, सामाजिक सुरक्षा व अन्य प्रकारच्या कल्याणकारी योजनेतंर्गत लाभाचे वाटप केले जाते.

राज्यातील बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येत असलेल्या कल्याणकारी योजनांचे लाभ मंडळाकडे नोंदीत होणाऱ्या बांधकाम कामगारांना दिले जातात. नोंदीत बांधकाम कामगारांकडून मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचे निकष पुर्ण करणाऱ्या पात्र बांधकाम कामगारांनाच मंडळ योजनांचे लाभ मंडळ प्रणालीद्वारे रोख रक्कम स्वरूपात लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात हस्तांतरीत केले जातात. (DBT in Money) आणि काही योजनांचे लाभ वस्तू स्वरुपात थेट लाभार्थ्यांना हस्तांतरीत केले जातात. (DBT in Kind) देण्यात येतात.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये तपासणी ते उपचार या योजनेचा समावेश आहे मंडळाकडील नोंदीत (सक्रिय) जीवित बांधकाम कामगारांची व त्यांचेवर अवलंबित कुटुंबामधील यथास्थिती पती/पत्नी आणि त्यांची १० वर्षावरील २ अविवाहीत अपत्ये यांची मे. एच. एच. एल. लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) व मे. एच.एस.सी.सी (इंडिया) लिमिटेड यांचेमार्फत "तपासणी ते उपचार" (Test to Treat) आरोग्य योजना राबविण्यास उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दि.३१.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार सदर संस्थांसोबत दि.२१.०२.२०२४ रोजी करारनामा करण्यात आला असून दि.२१.०२.२०२४ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

सदर योजनेमध्ये बांधकाम कामगार, यथास्थिती पती/ पत्नी व त्यांचेवर अवलंबित १० वर्षावरील २ अपत्य, यथास्थिती आई वडीलांचा/सासु सासऱ्यांचा समावेश आहे. सदर योजनेमध्ये आरोग्य तपासणी, औषधोपचार, प्रगतपृष्ठीकरण चाचणी (Confirmatory Test) रुग्णालय भरती यांचा समावेश आहे.

मंडळामार्फत गंभीर आजाराच्या उपचारार्थ रू.१,००,०००/- एवढे वैद्यकीय सहाय्य देण्यात येते तसेच नैसर्गिक प्रसुतीकरीता १५,०००/- व शस्त्रक्रियेव्दारे प्रसुतीकरीता २०,०००/-इतके

अर्थसहाय्य देण्यात येते. तपासणी ते उपचार योजनेअंतर्गत प्रति वर्ष प्रति लाभार्थी रू.२.०० लक्ष उपचार खर्चाची मर्यादा आहे. विशिष्ट आजाराच्या प्रकरणी उपचाराचा खर्च रक्कम २.०० लक्षपेक्षा जास्त मात्र ७.०० लक्षच्या मर्यादेत होणार असल्यास संबंधीत रूग्णालयाच्या वैद्यकीय प्रमुख यांची शिफारस तसेच जिल्हा कामगार सुविधा केंद्राचे प्रमुख कामगार उप आयुक्त/सहायक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी यांच्या मान्यतेने व संबंधित जिल्यहाच्या शासकीय रूग्णालयाचे अधिष्ठाता यांच्या शिफारशीने अशी प्रकरणे बांधकाम कामगार आरोग्य समितीच्या मान्यतेअंती मंजूर करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे योजनांची व्दिरूक्ती टाळण्याकरीता उपरोक्त नमूद गंभीर आजाराच्या उपचारार्थ रू.१.०० लक्ष अर्थसहाय्य तसेच प्रसुती व त्यासंबंधीचे उपचार तपासणी ते उपचार आरोग्य योजनेत समाविष्ट असल्यामुळे नैसर्गिक प्रसुतीकरीता १५,०००/- व शस्त्रक्रियेव्दारे प्रसुतीकरीता २०,०००/-इतके अर्थसहाय्य या दोन योजना बंद करण्याबाबतचा प्रस्ताव मा. मंत्री (कामगार) यांच्या मान्यतेने शासनास सादर करण्यात आला होता.

दि.०७.०८.२०२३ रोजीच्या शासन निर्णयामध्ये बांधकाम कामागारांची १० वर्षाखालील २ अपत्ये अपघात अथवा इतर आजारपणाकरीता रूग्णालय भरती व औषधोपचारास पात्र राहतील मात्र त्यांना प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणी अनुज्ञेय राहणार नाही असे नमूद आहे. तथापि, सदर बांधकाम कामगारांच्या अपत्यांस १८ वर्ष पुर्ण झाली असेल तर सदर व्यक्ती कायद्याने सज्ञान म्हणून गणण्यात येत असल्याने त्यांना "तपासणी ते उपचार" आरोग्य योजनेचा कोणताही लाभ मिळणार नाही असेही प्रस्तावित करण्यात आले असून सदर प्रस्ताव मा. मंत्री (कामगार) यांच्या मान्यतेने शासनास सादर करण्यात आला होता.

उपरोक्त दोन्ही प्रस्तावास शासनाच्या दि.१३.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये गंभीर आजाराच्या उपचारार्थ रू.१.० लक्ष अर्थसहाय्य आणि प्रसुती लाभाकरीता देण्यात येणारे अर्थसहाय्य (नैसर्गिक प्रसुतीसाठी रु.१५,०००/- व शस्त्रक्रियेद्वारे प्रसुतीसाठी रु. २०,०००/- एवढे आर्थिक सहाय्य) योजना बंद करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

**ठराव क्र. ६३ (८)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत तपासणी ते उपचार आरोग्य योजना कार्यान्वित झाल्याने योजनांची व्दिरूक्ती टाळण्यासाठी गंभीर आजाराच्या उपचारार्थ रू. १ लक्ष अर्थसहाय्य व प्रसुती लाभाकरीता देण्यात येणारे अर्थसहाय्य (नैसर्गिक प्रसुतीसाठी रु.१५,०००/- व शस्त्रक्रियेद्वारे प्रसुतीसाठी रु. २०,०००/- एवढे आर्थिक सहाय्य) योजना बंद करण्याच्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र. ०९ :- **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील विविध कल्याणकारी योजनांच्या संगणकी प्रणाली/पोर्टलचे महाराष्ट्र शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग अंतर्गत RCMS (Ration Card Management System) पोर्टलशी संलग्नीकरण (Integration) करणेबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम व्यवसायमधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ लागू केला आहे. सदर अधिनियमातील कलम (१८) नुसार प्रत्येक राज्याने इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ गठीत करावयाचे आहे. त्या अनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्थी) नियम, २००७ अस्तित्वात आले असून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

बांधकाम क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांची नोंदणी/ नुतनीकरण मंडळांतर्गत करण्यात येत असून, त्यांना मंडळाकडे जमा होणाऱ्या बांधकाम उपकरातून शैक्षणिक सहाय्य, आरोग्य विषयक योजना, सामाजिक सुरक्षा योजना व आर्थिक सहाय्य अशा विविध कल्याणकारी योजनांचे लाभ वितरित करण्यात येतात संबंधित योजनांचा लाभ मिळणेकरिता लाभार्थ्याने शिधापत्रिका संगणक प्रणालीत अर्ज करताना सादर करणे आवश्यक आहे योजनांचा तपशिल खालीलप्रमाणे –

| अ. क्र. | योजना साकेतांक | विविध कल्याणकारी योजना |
|---|---|---|
| १ | E-०१ | नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना इयत्ता १ ली ते ७ वी साठी प्रतिवर्षी रु.२५००/- आणि इयत्ता ८ वी ते १० वी साठी प्रतिवर्षी रु.५०००/- शैक्षणिक अर्थसहाय्य. |
| २ | E-०२ | नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी मध्ये किमान ५०% किंवा अधिक गुण मिळाल्यास रु.१००००/- शैक्षणिक अर्थसहाय्य. |
| ३ | E-०३ | नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी च्या शिक्षणासाठी प्रती शैक्षणिक वर्षी रु.१००००/- |
| ४ | E-०४ | नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना पदवीच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामुग्रीसाठी प्रतिवर्षी रु.२००००/- |
| ५ | E-०५ | नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाकरिता प्रतिवर्षी रु.१०००००/- व अभियंत्रिकी पदवी |

| | | |
|---|---|---|
| | | अभ्यास क्रमाकरीता रु.६००००/- |
| ६ | E-०६ | नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना पदविकेकरिता प्रतीवर्षी रु.२००००/- व पदव्युत्तर पदवी करिता रु.२५०००/- |
| ७ | E-०७ | नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना संगणकाचे शिक्षण (MS-CIT) करिता शुल्काची प्रतिपुर्ती |
| ८ | H-०१ | नोंदीत बांधकाम कामगाराच्या पहिल्या दोन जिवित अपत्यांच्या नैसर्गिक प्रसुतीसाठी रु.१५०००/- व शस्त्रक्रियेव्दारे प्रसुतीसाठी रु.२००००/- |
| ९ | H-०२ | नोंदीत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांना गंभीर आजाराच्या उपचारार्थ रु.१०००००/- ( एका सदस्यास केवळ एकदाच आणि कुटूंबातील दोन सदस्यांपर्यत मर्यादित) तथापि, आरोग्य विमा योजना लागू नसल्यासच सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय असेल. |
| १० | H-०३ | पती/पत्नीने पहिला मुलीच्या जन्मानंतर कुटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास त्या मुलीच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत १८ वर्षापर्यंत रु.१०००००/- मुदत बंद ठेव |
| ११ | H-०४ | नोंदीत बांधकाम कामगारास ७५% अपंगत्व आल्यास रु.२०००००/- अर्थसहाय्य |
| १२ | F-०१ | नोंदणीकृत बांधकाम कामगाराचा बांधकामाच्या ठिकाणी अपघाती मृत्यु झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रु.५,००,०००/- |
| १३ | F-०२ | नोंदणीकृत बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यु झाल्यास रु.२,००,०००/- |
| १४ | F०३ | नोंदणीकृत बांधकाम कामगाराला घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील रु.६ लाख पर्यंतच्या व्याजाची रक्कम अथवा रु.२.लक्ष अनूदान |
| १५ | F-०५ | नोंदणीकृत बांधकाम कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या अंत्यविधीकरिता रु.१०,०००/- |
| १६ | F-०६ | नोंदणीकृत बांधकाम कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या विधवा पत्नी अथवा स्त्री कामगाराच्या विधुर पतीस रु.२४,०००/- (५ वर्षाकरिता), (प्रति वर्षी अर्ज करणे आवश्यक राहील) |
| १७ | F०८ | अपघाती/नैसर्गिक मृत्यु झालेल्या नोंदीत कामगार लाभार्थीचे शव शववाहिलीव्दारे मूळ गावी पाठवणीसाठी एस.टी महामंडळाच्या आगर प्रमुख्याने |
| १८ | S०१ | नोंदीत बांधकाम कामगाराच्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रु.३०,०००/- |
| १९ | S१३ | नोंदीत बांधकाम कामगाराच्या एका मुलीच्या विवाह करीता रु.५१,०००/- एवढे अर्थसहाय्य देणे |

उपरोक्त योजनांअंतर्गत DBT द्वारे अर्थसहाय संबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यात (DBT in Cash) जमा करण्यात येते. त्याचप्रमाणे मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांना सुरक्षा संच, अत्यावश्यक संच,व गृहपयोगी वस्तू संच (DBT in kinds) वस्तू स्वरूपात आणि तपासणी ते उपचार आरोग्य योजना. आवास योजना राबविण्यात येते. मंडळाच्या योजनेचे लाभार्थी मंडळाकडे नोंदित आहेत. तथापि, मंडळाच्या काही योजना ह्या कुटुंबाकरिता एकच लाभ यास्वरूपात मर्यादित आहेत. मंडळाकडे कामगारांच्या कुटुंबियांचा तपशिल उपलब्ध नाही तथापि हा तपशिल रेशन कार्डमध्ये उपलब्ध आहे. सध्या मंडळाकडे प्राप्त होणाऱ्या (DBT in Cash) योजनांच्या अर्जांचे प्रमाणीकरण (Validation) करण्याची कोणतीही ठोस यंत्रणा मंडळाकडे नाही. तसेच DBT in kinds योजनांतर्गत लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांचे अधिकृत कुटुंबियांच्या माहितीचे प्रमाणीकरणाचीही (Validation) मंडळाकडे सध्या कोणतीही ठोस यंत्रणा उपलब्ध नाही. मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना रेशन कार्ड व्यवस्थापन प्रणालीशी (RCMS) संलग्न केल्यास मंडळाच्या नोंदणी, नुतणीकरण व विविध कल्याणकारी योजनांच्या लाभ वाटपाच्या कार्यक्षमतेत वाढ होऊन सेवा वितरण अधिक सुलभ होईल त्याचप्रमाणे मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांतर्गत अर्जांची छाननी करताना पारदर्शकतेमध्ये वाढ होईल तसेच रेशन कार्ड व्यवस्थापन प्रणाली (RCMS) व मंडळाच्या DBT in cash स्वरूपाच्या कल्याणकारी योजनाकरिता राबविण्यात येणाऱ्या एकात्मिक संगणक प्रणाली (IWBMS) यांचे संलग्नीकरण (Integration) झाल्यास आणि मंडळाचे वस्तू आणि सेवा स्वरूपातील योजनांच्या संबंधित पोर्टलचे RCMS प्रणालीशी संलग्नीकरण (Integration) झाल्यास मंडळामार्फत देय लाभ योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल. तसेच सदर संलग्नीकरणामुळे लाभार्थी निश्चित होऊन कागदपत्रे तपासण्यास लागणारा कालावधीदेखील कमी होईल.

तरी, मंडळामार्फत विकसित करण्यात आलेल्या एकात्मिक कामगार कल्याण व्यवस्थापन प्रणाली (IWBMS) व रेशन कार्ड व्यवस्थापन प्रणाली (RCMS) यांचे तसेच मंडळाचे सुरक्षा संच पोर्टल, अत्यावश्यक संच पोर्टल, गृहपयोगी वस्तू संच पोर्टल, तपासणी ते उपचार आरोग्य योजना पोर्टल यांचे रेशन कार्ड व्यवस्थापन प्रणालीशी (RCMS) संलग्नीकरण करणेकरिता कामगार विभागाकडून अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागास प्रस्ताव सादर करण्यास मंडळाच्या दि.१२.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

**ठराव क्र. ६३ (९)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील विविध कल्याणकारी योजनांच्या संगणकी प्रणाली/पोर्टलचे महाराष्ट्र शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग अंतर्गत RCMS (Ration Card Management System) पोर्टलशी संलग्नीकरण (Integration) करणेबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**



सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

**अध्यक्ष**
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.१० :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील शैक्षणिक अर्थसहाय्याच्या योजना महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभाग अंतर्गत SARAL२.० पोर्टलशी संलग्न करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम व्यवसायमधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ लागू केला आहे. सदर अधिनियमातील कलम (१८) नुसार प्रत्येक राज्याने इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ गठीत करावयाचे आहे. त्या अनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्थी) नियम, २००७ अस्तित्वात आले असून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

बांधकाम क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांची नोंदणी/ नुतनीकरण मंडळांतर्गत करण्यात येत असून, त्यांना मंडळाकडे जमा होणाऱ्या बांधकाम उपकरातून इयत्ता १ ली ते १२ वीच्या विद्यार्थ्यांकरीता खालील शैक्षणिक सहाय्य योजना राबविण्यात येतात.

| योजना साकेतांक | शैक्षणिक अर्थसहाय्याच्या शिष्यवृत्ती योजना |
|---|---|
| E-०१ | नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना इयत्ता १ ली ते ७ वी साठी प्रतिवर्षी रु.२५००/- आणि इयत्ता ८ वी ते १० वी साठी प्रतिवर्षी रु.५०००/- शैक्षणिक अर्थसहाय्य. |
| E-०२ | नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी मध्ये किमान ५०% किंवा अधिक गुण मिळाल्यास रु.१००००/- शैक्षणिक अर्थसहाय्य. |
| E-०३ | नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी च्या शिक्षणासाठी प्रती शैक्षणिक वर्षी रु.१००००/- |

उपरोक्त योजनांना DBT द्वारे अर्थसहाय वितरीत करण्यात येते. सध्या मंडळाकडे प्राप्त होणाऱ्या अर्जांमधील नमूद बांधकाम कामगारांचे पाल्य संबंधित इयत्तेत शिक्षण घेत आहे किंवा कसे ? याबाबत प्रमाणीकरण (Validation) करण्याची कोणतीही ठोस यंत्रणा मंडळाकडे नाही. सध्यस्थितीत शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील सरल (SARAL २.०) या प्रणालीमार्फत विद्यार्थ्यांना शैक्षणिक अर्थसहाय्य वितरित करण्यात येत आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील सरल (SARAL २.०) प्रणालीवर प्रत्येक विद्यार्थ्यांस एक UDISE ID व Student Id देण्यात आला आहे. सदर UDISE ID व Student Id चे मंडळाच्या प्रणालीशी संलग्निकरण (Integration) झाल्यास अचूक पात्र विद्यार्थ्यांस अर्थसहाय्य वितरीत करणे शक्य होईल. सबब, याबाबत कामगार विभागाकडून शालेय शिक्षण व क्रिडा विभागास कळविण्याबाबत मंडळाच्या ११.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

**ठराव क्र. ६३ (१०)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील शैक्षणिक अर्थसहाय्याच्या योजना महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभाग अंतर्गत SARAL२.० पोर्टलशी संलग्न करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.११ महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील सन २०२५-२६ मधील माहे एप्रिल -सप्टेंबर या काळात मंडळाच्या गुंतवणूक उपसमितीने अतिरिक्त निधी राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये गुंतवणुक केल्याच्या कार्यवाहीस मान्यता देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व वित्त विभाग, शासन निर्णय दि. २७.१०.२०१५ व १३.०३.२०२० मधील मार्गदर्शक सुचनानुसार, मंडळाकडील जमा उपकर निधीपैकी अतिरिक्त निधीची गुंतवणुक राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये गुंतवणूक उपसमितीद्वारे गुंतवणूक करण्याचे निर्देश आहेत. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडील पत्र दि. ०५.०७.२०२१ अन्वये गुंतवणुक उपसमितीचे खालीलप्रमाणे पुर्नगठन करण्यात आले आहे.

| अ.क्र. | गुंतवणुक उपसमिती | पद |
|---|---|---|
| १. | मा. मंत्री महोदय, कामगार विभाग तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष |
| २. | मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| ३. | उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ४. | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई | सदस्य |

उपरोक्त नमुदप्रमाणे गुंतवणूक उपसमितीने मंडळाकडील अतिरीक्त निधी राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये गुंतवणूक करण्यासाठी वेळोवेळी बैठकांचे आयोजन करून कामकाज पुर्ण केले आहे. त्यास मंडळाची मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुसार सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये एप्रिल ते सप्टेंबर या सहा महिन्याच्या कालावधीत मंडळाकडील अतिरीक्त निधी रू ४८५० कोटी राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये गुंतवणूक केलेच्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता आवश्यक आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेश व वित्त विभाग,शासन निर्णय दि. २७.१०.२०१५ व १३.०३.२०२० मधील मार्गदर्शक सुचनानुसार, मंडळाकडील शासनमान्य गुंतवणूक उपसमितीने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये एप्रिल ते सप्टेंबर या सहा महिन्याच्या कालावधीत ६ मुदत ठेव पावत्यांच्या एकुण रू. ४८५० कोटी गुंतवणूकींकरीता बैठकांचे आयोजन केले व त्याद्वारे सर्व संबंधित राष्ट्रीयकृत बँकाकडून ऑनलाईन प्रकाराने मायक्रोसॉफ्ट मीट या ॲप्लिकेशनवर रेकॉडेड व्हीडीओ कॉन्फरन्सींगव्दारे एक वर्षाच्या कालावधीसाठी Non Callable प्रकारातील मुदतबंद ठेव पावतीमधील गुंतवणूकीकरीता खुल्या स्पर्धात्मक व्याजदर बोलीने केलेल्या

प्रक्रीयेत १२ राष्ट्रीयकृत बँकाकडून प्राप्त दरांपैकी सर्वोच्च व्याजदर बोली लावलेल्या खालील नमुद राष्ट्रीयकृत बँकामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व शासन निर्णय दि. २७.१०.२०१५ व दि. १३.०३.२०२० मधील मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून गुंतवणूक करण्यात आली आहे.त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

**(रु.कोटीत)**

| अ. क्र. | बँकेचे नाव | शाखेचे नाव | गुंतवणूक दिनांक | परिपक्वता दिनांक | गुंतवणुक रक्कम | व्याजदर द.सा.द. शे | परिपक्वतेनंतर प्राप्त होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | स्टेट बँक ऑफ इंडिया | बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई. | २४.०४.२०२५ | २४.०४.२०२६ | ११०० | ७.३३% | ११८२.८७ |
| २. | इंडियन बँक | बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई. | १३.०५.२०२५ | १३.०५.२०२६ | १५०० | ७.२८% | १६१२.२१ |
| ३. | युनियन बँक ऑफ इंडिया | भारत डायमंड बोर्स, वांद्रे(पू), मुंबई | २२.०५.२०२५ | २२.०५.२०२६ | ११५० | ७.१९% | १२३४.९४ |
| ४. | युको बँक | खार शाखा, मुंबई | २८.०५.२०२५ | २८.०५.२०२६ | ६०० | ६.९९% | ६४३.०५ |
| ५. | पंजाब नॅशनल बँक | बी. के. सी. शाखा | ०३.०६.२०२५ | ०३.०६.२०२६ | ५०० | ६.९५% | ५३५.६६ |
| | **एकुण** | | | | **४८५०** | | **५२०८.७३** |

वरीलप्रमाणे, गुंतवणूक उपसमितीने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या एप्रिल ते सप्टेंबर, २०२५ या सहा महिन्याच्या कालावधीतील मंडळाकडील अतिरिक्त निधी रू ४८५० कोटी राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये एक वर्षाच्या कालावधीसाठी Non Callable प्रकाराने केलेल्या गुंतवणूक कार्यवाहीस मंडळाची मान्यता घेणे प्रस्तावित आहे. मंडळ मान्यतेनंतर प्रशासकीय विभागास सदर गुंतवणूकीचा अहवाल सादर करणेचे कार्यवाहीस मान्यतेस्तव सादर करणे प्रस्तावित आहे.

**ठराव क्र. ६३ (११)/२०२५:-**

**सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात माहे एप्रिल ते सप्टेंबर, २०२५ या सहा महिन्याच्या कालावधीतील मंडळाकडील अतिरिक्त निधी रू. ४८५० कोटी राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये एक वर्षाच्या कालावधीसाठी Non Callable प्रकाराने मंडळाच्या गुंतवणूक उपसमितीने केलेल्या गुंतवणूक कार्यवाहीस मंडळाची मंजूरी व मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. १२:-** **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या सनदी लेखापाल यांच्याकडून तयार केलेल्या "वार्षिक जमा खर्चाच्या लेख्यास" (Annual Account) मान्यता घेणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत आणि इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २७ (१) अन्वये मंडळाचे प्रत्येक आर्थिक वर्षाचे लेखे तयार करणेबाबत तरतूद आहे. अधिनियमाच्या कलम २७ (२ ते ५) मंडळाच्या मान्यतेने, मा. महालेखापालांच्या लेखापरीक्षणानंतर वार्षिक अहवाल शासनमार्फत विधीमंडळासमोर सादर करण्याची तरतूद आहे. मंडळाचे सन २००७-०८ पासून ते सन २०२१-२२ अखेरचे वार्षिक अहवाल विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या पटलावर सादर करण्यात आले आहेत. सन २०२२-२३ व सन २०२३-२४ वर्षांचे वार्षिक लेखे सनदी लेखापालांकडून तयार करून मंडळाची मान्यता घेण्यात आली आहे. सदर लेख्यांचे मा. महालेखापाल कार्यालयाकडून संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) होवून उपस्थित केलेल्या प्रारूप लेखापरीक्षण अहवालाचे (Draft SAR) अनुपालन मंडळाकडून सादर केले आहे. मा महालेखापाल कार्यालयाकडून अंतिम लेखापरीक्षण अहवाल (SAR) प्राप्त होताच अंतिम लेखे विधीमंडळाच्या आगामी अधिवेशनात दोन्ही सभागृहाच्या पटलावर सादर करण्याची कार्यवाही नियोजित आहे. सद्या मंडळाचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे सनदी लेखापाल यांचेकडून तयार व प्रमाणित करून घेण्यात आलेल्या जमा व खर्चाच्या लेख्यांना मंडळाची मान्यता आवश्यक आहे.

मंडळाच्या वार्षिक लेख्यांमध्ये, उत्पन्न व खर्च विवरणपत्र (Income & Expenditure Accouts), ताळेबंद (Balance Sheet), जमा व खर्चाची परिशिष्ठे (Shedules), जमा व खर्चाचे विवरणपत्र (Receipt & Payament Accounts) इ.चा समावेश असतो. अशाप्रकारचे सन २००७-०८ पासून ते ते सन २०२१-२२ अखेरचे वार्षिक अहवाल विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या पटलावर सादर करण्यात आले आहेत. सन २०२२-२३ व सन २०२३-२४ वर्षांचे वार्षिक लेखे सनदी लेखापालांकडून तयार करून मंडळाची मान्यता घेण्यात आली आहे. सदर लेख्यांचे मा. महालेखापाल कार्यालयाकडून दि.०२.०६.२०२५ ते दि. १७.०६.२०२५ या कालावधीत संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) होवून उपस्थित केलेल्या प्रारूप लेखापरीक्षण अहवालाचे (Draft SAR) अनुपालन मंडळाकडून दि. ०१.०८.२०२५ रोजी सादर केले आहेत. मा महालेखापाल कार्यालयाकडून अंतिम लेखापरीक्षण अहवाल (SAR) प्राप्त होताच अंतिम लेखे विधी मंडळाच्या आगामी अधिवेशनात दोन्ही सभागृहाच्या पटलावर सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

सद्या मंडळाचे आर्थिक वर्ष २०२४-२५ या वर्षाचे जमा व खर्चाचे लेखे मंडळाने नियुक्त केलेल्या सनदी लेखापाल (CA) मे. के. एस. संघवी आणि कंपनी, मुंबई यांचेकडून लेखे तयार व प्रमाणित करून मंडळास सादर करण्यात आले आहेत. सदरहू लेखे मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात येत आहेत. सदर लेख्यांमध्ये, उत्पन्न व खर्च विवरणपत्र (Income & Expenditure Accouts), ताळेबंद (Balance Sheet), जमा व खर्चाची परिशिष्ठे (Shedules), जमा व खर्चाचे विवरणपत्र (Receipt & Payament Accounts) इ.चा समावेश असून त्याची प्रत सोबत जोडण्यात आली आहे.

मंडळाचे मान्यतेनंतर सदर लेख्यांचे संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) करण्यासाठी भारताचे मा. नियंत्रक व महालेखापरीक्षक कार्यालयास सादर करण्याच्या कार्यवाहीस मान्यतेस्तव सादर. मा. महालेखापाल कार्यालयाने संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) मध्ये काही आक्षेप उपस्थित केलेस त्यांचे अनुपालन करून परीपूर्ण लेखे इमारत आणि इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २७ (२ ते ५) अन्वये मंडळाच्या मान्यतेने, मंडळाचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या "वार्षिक जमा खर्चाच्या लेख्याचा" (Annual Account) अहवाल शासनमार्फत विधीमंडळासमोर सादर करणेत येत आहे. तरी, मंडळाचे नियुक्त सनदी लेखापाल यांचेकडून तयार व प्रमाणित करून घेतलेल्या सन २०२४-२५ आर्थिक वर्षाच्या जमा व खर्च लेख्यांना मंडळाचे मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव क्र. ६३ (१२)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे नियुक्त सनदी लेखापाल यांनी तयार व प्रमाणित केलेल्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या "वार्षिक जमा खर्चाच्या लेख्यास" (Annual Account) मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

**विषय क्र. १३:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे प्राप्त अतिरिक्त उपकर परतावा प्रकरणांना मान्यता देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९६ मधील कलम ३(१) व भारत सरकार यांचे दि. २६.०९.१९९६ चे परिपत्रक तसेच महाराष्ट्र दि. २१.०४.२००८ च्या परिपत्रकानूसार बांधकामावरील खर्चाच्या १ टक्क्यापेक्षा कमी नाही एवढा (जमीनीची किंमत वगळून) उपकर मंडळाकडे जमा करण्याची तरतूद आहे. त्यानुसार, विविध प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांच्याकडून मंडळाच्या बँक खात्यात उपकर भरणा केला जातो.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर नियम १९९८ मधील नियम ८ अन्वये उपकराची परिगणना चूकीची झाल्यास अथवा चुकीच्या पध्दतीने उपकराचा भरणा मंडळाकडे झाल्यास तो परतावा करण्याबाबत तरतूद आहे. मंडळ बैठक क्र. १८.०७.२०१८ मधील ठराव क्र. ४७(१२)/२०१८ अन्वये, मंडळाच्या दि. १६.०६.२०१८ रोजीच्या बैठकीच्या ठरावानुसार उपकर परतावा करताना सदर प्रकरणे संबंधित जिल्हा कार्यालयाकडून छाननी करून विभागीय कार्यालयांमार्फत परताव्याची शिफारस प्राप्त झाल्यावर मंडळ स्तरावर छाननी अंती प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात यावा, व शासन मान्यतेनुसार मंडळ स्तरावरून परताव्याची कार्यवाही करण्यात यावी अशी असा ठराव मंजूर आहे.

उपरोक्त ठरावानुसार बांधकाम उपकर परतावा मंडळाच्या पुढील बैठकीत मान्यतेच्या अधीन राहुन प्रदान करण्यात आला आहे, अशी प्रकरणे खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | आस्थापनाचे नाव | उपकर परतावा मागणी रक्कम (रु) | आरटीजीद्वारे परतावा अदा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | श्री. महेश अशोक वाघमारे, रा. म्हसवड, ता. माण, जि. सातारा | ५,०००/- | दि. १८.०३.२०२५ रोजी RTGS द्वारे उपकर परतावा करण्यात आला. |
| २ | सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांच्या तर्फे श्री. माधव नारायण दराडे | २,५०,०००/- | दि. २५.०७.२०२५ रोजी RTGS द्वारे उपकर परतावा करण्यात आला |
| ३ | मे. आरुष इंडस्ट्रीज, छत्रपती संभाजीनगर | १,००,०००/- | दि. ३१.०७.२०२५ रोजी RTGS द्वारे उपकर परतावा करण्यात आला |
| **उपकर परतावा करण्यात आलेली रक्कम** | | **३,५५,०००/-** | |

तसेच खालील तक्त्यात नमूद बांधकाम उपकर परतावा प्रकरणे मंडळास प्राप्त झाली असून मंडळाचे दि. १६.०६.२०१८ रोजीच्या ठरावाच्या अनुषंगाने संबंधीत कार्यालयाकडून सदर प्रकरणी बांधकाम उपकर प्रलंबित नसल्याबाबत तसेच देय/नादेय अहवाल मागवून पुढील बैठकीत मान्यतेच्या अधीन राहून बांधकाम उपकर परताव्याच्या मान्यतेसाठी प्रस्तावित.

**(रक्कम रुपयात)**

| अ.क्र | प्राधिकरण/ संस्था/व्यक्तिचे नांव | उपकर परताव्याचे कारण | उपकर परताव्याच्या मागणी |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यवस्थापन विभाग, सातारा | मंडळाच्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा बांद्रा (पूर्व) मुंबई खातेवर कामगार कल्याण निधी अंतर्गत दि.०८.०४.२०२४ रोजी त्याच खात्यावरुन नजरचुकीने रक्कम १,९५,९६१/- मंडळाच्या खात्यावर एनइएफटी द्वारे जमा करण्यात आलेली आहे. तेव्हा दुबार जमा झालेली रक्कम परत करण्याची विनंती केली आहे. | १,९५,९६१/- |
| २ | फॉर एव्हरीग्रीन रिसायकल करो प्रा.लि. | मे. एव्हरग्रीन रिसायकल करो प्रा. लि., पालघर, यांना नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, पालघर यांनी दि. ११.०३.२०२४ च्या बांधकाम परवाना नूसार एकूण बांधकाम मूल्य रक्कम रु. ६,३०,६१,०३७/- चे १% रक्कम रु. ६,३०,७००/- निश्चित केल्याप्रमाणे दि.२८.०५.२०२४ रोजी मंडळाच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे. परंतू त्याच खात्यावर नजरचुकीने रक्कम रु. ५४,०००/-, रक्कम रु. २१,०००/-, रक्कम रु. १०,८००/- व रक्कम रु.४,३७,७००/- असे एकूण रक्कम रु. ५,२३,५००/- मंडळाच्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बी.के.सी. शाखा, खाते क्रं. ३६७११७८५९१ मध्ये एनइफटीद्वारे मंडळाच्या खाती चुकीने जमा झालेले रक्कम परत करण्याबाबत विनंती केली आहे. | ५,२३,५००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | पंचायत समिती निलंगा, लातूर | पंचायत समिती निलंगा, लातूर यांना मार्च – २०२३ च्या कपातीचे वित्तप्रेषण देण्यात आले होते. शाखेने दि. ०५.०७.२०२३ रोजी मंडळाच्या युनियन बँक ऑफ इंडिया, खाते क्र. ४४४३०२०१०१०४९२० मध्ये एनइफटीद्वारे मंडळाच्या खाती रक्कम रु.२,७७,९२०/- कामगार कल्याण उपकर रक्कम जमा केलेले आहे. परंतू दि. ०६.०७.२०२३ रोजी त्याच मंडळ खाती रक्कम रु. २,७७,९२०/- ही दुबार जमा झालेली आहे. सदर दुबार जमा झालेली रक्कम परत करण्याबाबत विनंती केली आहे. | २,७७,९२०/- |
| ४ | बँक ऑफ इंडिया तर्फे मिरा - भाईंदर महानगरपालिका | मिरा भाईंदर महानगरपालिका, भाईंदर, ठाणे, यांनी दि. १३.१०.२०२३ रोजी कामगार कल्याण उपकर रक्कम रु. १७,०५,९७७/- आरटीजीएस द्वारे मंडळाच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे. परंतू त्याच खात्यावर नजरचुकीने रक्कम रु. १७,०५,९७७/- मंडळाच्या बँक ऑफ इंडिया, ताडदेव शाखा, खाते क्रं. ००४२२०११००००१५३ मध्ये एनइफटीद्वारे मंडळाच्या खाती चुकीने दुबार जमा झालेले आहे. सदर रक्कम परत करण्याबाबत विनंती केली आहे. | १७,०५,९७७/- |
| ५ | डॉ. मनिष भालेराव सोनवणे, मालेगांव, जि. नाशिक | श्री. मनीष भालेराव सोनवणे, मालेगावं, जि. नाशिक यांना पावती क्र.३७७ दि.१५.०७.२०२४ नुसार बांधकाम उपकर रक्कम रु. ९,९०६/- अंतर्भूत करुन रक्कम रु. १७,४८४/- मालेगावं महानगरपालिका यांच्याकडे जमा केले आहेत. तसेच त्याच दिवशी मंडळाच्या खात्यावर त्या व्यतिरीक्त रक्कम रु.२७,४८९/- चुकीने UPI द्वारे जमा झाली आहे. सदर जमा झालेली रक्कम परत करण्याबाबत अर्जदाराने दि. ३१.०७.२०२४ च्या पत्रान्वये विनंती केली आहे. | २७,४८९/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | श्री. विलास धनराज कटारीया, पारनेर नगरपंचायत, पारनेर | श्री. विलास धनराज कटारिया यांनी नगरपंचायतीकडे बांधकाम परवाना घेताना नगरपंचायतीच्या मागणी पत्रानुसार रक्कम १,३४,१५२/- एवढा बांधकाम उपकर भरणे आवश्यक असताना अनवधानाने रक्कम रु. १,८४,१०७/- इतका बांधकाम उपकर मंडळाकडे भरणा करण्यात आला आहे. ज्यादा भरण्यात आलेला बांधकाम उपकर रक्कम रु.४९,९५५/- परत करण्याबाबत नगरपंचायतीकडून पत्रानुसार विनंती करण्यात आली आहे. | ४९,९५५/- |
| ७ | श्री. सिद्धार्थ भोजराम मेश्राम, तुमसर, भंडारा | श्री. सिद्धार्थ भोजराम मेश्राम, तुमसर, जि. भंडारा यांनी ऑनलाईन BPMS पोर्टलवर नवीन घराची बांधकाम परवानगी मिळणेकरीता विकास शुल्क व कामगार उपकर (लेबर सेस) शुल्कचा भरणा करणेबाबत कळविले असता संबंधितांनी दि. २२.११.२०२३ रोजी रक्कम रु. २५,२८५/- मंडळाच्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बी.के.सी. शाखा, खाते क्रं. ३६७११७८५९१ मध्ये RTGS द्वारे जमा केलेली आहे. परंतु अर्जदार श्री. सिद्धार्थ मेश्राम यांनी दि. १३.०५.२०२४ रोजी सकाळी १०.५५ वा व दुपारी २.२५ वा. अनुक्रमे रक्कम रु. ५००/- व रक्कम रु. २५,०००/- अशी एकुण मुळ रक्कम रु.२५,५००/- दुसऱ्या व्यक्तीस पाठविण्या ऐवजी त्यांच्या मोबाईल मधून फोन पे द्वारे सेव्ह असलेल्या मंडळाच्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया या खात्यावर अर्जदाराकडून नजरचुकीने पाठविण्यात आली आहे. सदर जमा केलेली रक्कम परत करण्याबाबत विनंती केली आहे. | २५,५००/- |
| ८ | मे. भुलक्ष्मी फार्मर प्रोड्यूसर कं. लि., ता. येवला, जि. | मे. भूलक्ष्मी फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी लिमिटेड, तांदुळवाडी, येवला, जि. नाशिक यांनी दि.१४.०६.२०२४ रोजी मंडळाच्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया, (बचत खाते) बीकेसी, मुंबई या खात्यावर | १,०७,०२४/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | नाशिक | रक्कम रु. १,०७,०२४/- नजरचुकीने जमा केली आहे. सदर जमा केलेली रक्कम परत करण्याबाबत अर्जदाराने विनंती केली आहे | |
| ९ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलडाणा | सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलडाणा यांनी कंत्राटदाराच्या देयकामधुन करारनामा रक्कमेच्या १% बांधकाम उपकर माहे एप्रिल -२०२० ते माहे एप्रिल -२०२४ पर्यंतची रक्कम रु. ८,६२,७८,१६९/- दि.१०.०७.२०२४ रोजी धनाकर्षाद्वारे मंडळाच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे. तसेच माहे मे-२०२४ ते नोव्हेंबर – २०२४ पर्यंतची रक्कम रु.१,००,४२,१४१/- दि. ०७.०१.२०२५ रोजी व माहे डिसेंबर -२०२४ पर्यंतची रक्कम रु. ७,६७,०५१/- दि.०६.०२.२०२५ रोजी पर्यंत १% बांधकाम उपकर भरणा करण्यात आला. परंतु दि. १०.०९.२०२४ रोजी रक्कम रु. ६,४२,९४,१६७/- ही रक्कम डायरेक्टर ऑफ इन्शुरन्स महाराष्ट्र स्टेट, मुंबई यांच्या खात्यावर भरण्याऐवजी नजरचुकीने मंडळाच्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बी.के.सी. शाखा, बांद्रा, मुंबई या खात्यावर CMP प्रणालीद्वारे जमा केलेली आहे. सदर रक्कम परत करण्याबाबत विनंती केली आहे. | ६,४२,९४,१६७/- |
| १० | श्री. रवीशंकर तेजराम वनवे, तुमसर, जि. भंडारा. | श्री. रविशंकर तेजराम वनवे, तुमसर, जि. भंडारा यांना नवीन घराचे बांधकाम परवानगी मिळणेकरीता बांधकाम कामगार उपकर (लेबर सेस) शुल्कचा भरणा करणेबाबत कळविले असता संबंधितांनी दि.१४.१२.२०२१ रोजी रक्कम रु. २३,४८२/- मंडळाच्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बी.के.सी. शाखा, खाते क्रं. ३६७११७८५९१ मध्ये ऑनलाईन पद्धतीने जमा केलेली आहे. परंतु अर्जदार श्री. रविशंकर तेजराम वनवे, यांनी दि. २१.०१.२०२२ रोजी रक्कम रु. ३८,०४०/- त्यांच्या मोबाईल मधून फोन पे द्वारे सेव्ह असलेल्या मंडळाच्या सेंट्रल बँक | ३८,०४०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ऑफ इंडिया या खात्यावर अर्जदाराकडून नजरचुकीने पाठविण्यात आली आहे. सदर जमा केलेली रक्कम परत करण्याबाबत विनंती केली आहे. | |
| ११ | शिक्षण विकास मंडळ, देवगड | शिक्षण विकास मंडळ, देवगड यांनी इमारत बांधकाम परवानगीसाठी देवगड जामसंडे नगरपंचायत यांचेकडे प्रस्ताव केला होता. सदर प्रस्ताव दि.१८.०७.२०२४ रोजीच्या परवानगी नुसार बांधकाम उपकर रक्कम रु. ६३,३४९/- भरणा करण्यास पत्र प्राप्त झाले असून दि.१९.०७.२०२४ रोजी मंडळाच्या युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा – डॉ. अंबेडकर रोड, बांद्रा या खात्यावर रक्कम रु.६३,३४९/- भरणा करण्या ऐवजी नजरचुकीने रक्कम रु. १,१५,६९१/- इतका अतिरीक्त भरणा करण्यात आले असून जादा जमा झालेली रक्कम रु.५२,३४२/- परत करण्याबाबत विनंती केली आहे. | ५२,३४२/- |
| | | **एकूण** | **६,७२,९७,८७५/-** |

**ठराव क्र. ६३ (१३)/२०२५:-**

**वरीलपैकी ३ (तीन) प्रकरणे एकुण रक्कम रु. ३,५५,०००/- (तीन लाख पंच्चावन्न हजार रुपये मात्र) केलेल्या प्रदानास कार्योत्तर मंजूरीस मान्यता व उर्वरीत ११ (अकरा) प्रकरणे एकुण रक्कम रु. ६,७२,९७,८७५/- (सहा कोटी बाहत्तर लाख सत्याण्णव हजार आठशे पंच्याहत्तर रुपये मात्र) च्या परताव्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.१४ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील क्र. MH०२ EP ५३११ या वाहनाचे निर्लेखन करून मा. प्रधान सचिव (कामगार) यांचेकरीता नवीन वाहन खरेदीस मान्यता देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालयामधील कार्यरत वाहन क्र. MH ०२ EP ५३११ असून सदर वाहन खरेदी करून एकुण ०८ वर्षाचा कालावधी पूर्ण झाला आहे व सदर वाहनाची धावसंख्या १,३७,०४० कि.मी. झाली आहे. सदर वाहनाच्या दुरूस्तीवर आजतागायत रक्कम रू. ३,९२,८९०/- इतका खर्च झाला आहे. शासन निर्णय, वित्त विभाग दि.१७.०४.२०१५ मधील अ.क्र. १९- क व नियम क्र. (६९) मध्ये शासकीय वाहन निरूपयोगी ठरविण्यास मंजूरी देण्याबाबतची तरतूद नमूद आहे. सदर बाबतीत सर्व अधिकार कार्यालय प्रमुखांना असल्याने शासन निर्णयातील अ.क्र. १९-क मधील अट क्र.०१ मधील अटीनुसार धावलेल्या वाहनाचे अंतर आणि वाहन वापरण्याचा कालावधी यापैकी जे नंतर पूर्ण होईल असे मोटार वाहन निर्लेखनाकरीता २,४०,००० किलोमीटर व १० वर्ष कालावधी पूर्ण असणे आवश्यक आहे असे नमूद आहे. परंतू, मंडळाचे वाहनाची धावसंख्या १,३७,०४० किलोमीटर इतके अंतर पूर्ण झाले आहे, व अट क्र.२ नुसार उपरोक्त अटी पूर्ण करण्यापूर्वीच एखादे वाहन (अपघात किंवा मोठ्या प्रमाणावरील बिघाड) निरूपयोगी ठरविण्याचे झाल्यास कार्यकारी अभियंता (यांत्रिकी), सार्वजनिक बांधकाम विभाग/कृषी अभियंता, शासकिय परिवहन सेवा किंवा प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कडून "वाहन दुरूस्त करून या पुढे उपयोगात आणण्याचे आर्थिक दृष्ट्या किफायतशिर राहणार नाही." असे प्रमाणपत्र मिळाल्यावरच ते वाहन निरूपयोगी ठरविण्यात येते.

सदर वाहनाची कालमर्यादा व धावसंख्या उपरोक्त शासन निर्णयातील अटीनूसार पूर्तता होत नसल्याने तसेच सदर वाहनाच्या ०८ वर्षाच्या कालावधीत दुरूस्तीवर मूळ किंमतीच्या ७३% रक्कम खर्च झाली असून सदर वाहनाचे यापुढे वापरात राहिल्यास आर्थिकदृष्ट्या किफायतशिर राहणार नसल्याने प्रादेशिक परिवहन कार्यालय मुंबई (पश्चिम) यांचेकडून दि.२६.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर वाहनाचे निर्लेखन करण्यास परवानगी मिळाली आहे.

शासकिय वाहनांचे किंमत मर्यादा धोरण करीता वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. वाहन २०२४/प्र.क्र.११/विनियम दि.०२.०२.२०२४ नुसार नवीन शासकीय वाहन खरेदी किंवा निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहन खरेदी करताना मा.प्रधान सचिव यांच्याकरीता रक्कम रू. २०.०० लक्ष इतक्या मर्यादेतील वाहन त्यांच्या दर्जानुसार शासकीय वाहन म्हणून अनुज्ञेय असून सदर निश्चित करण्यात आलेल्या वाहन किंमत मर्यादेत वस्तू व सेवा कराचा अंतर्भाव करण्यात आलेला नाही. तथापि, सदर किंमतीमध्ये वाहनांच्या किंमतीसोबत वाहनाची तात्पुरती नोंदणी खर्च

व सहाय्यभुत साहित्य (Accessories) खर्च इत्यादींसाठीच्या खर्चाचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

मंडळाकडील वाहन क्र.MH०२ EP ५३११ या वाहनाचे निर्लेखन करून नवीन वाहन खरेदी करण्याकरीता मा. मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष,महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांची दि.२५.०८.२०२५ रोजी व दि.०३.०९.२०२५ रोजी शासन मान्यता प्राप्त झाली आहे.

सबब, मंडळाकडील वाहन क्र. MH०२ EP ५३११ या वाहनाचे निर्लेखन करून मा.प्रधान सचिव (कामगार) यांचेकरीता Innova Hycross Vx (7 seater) Auto (YE) मॉडेल, Platinum White Pearl हे वाहन खरेदी करण्यात आले आहे.

**ठराव क्र. ६३ (१४)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील क्र. MH०२ EP ५३११ या वाहनाचे निर्लेखन करून मा. प्रधान सचिव (कामगार) यांचेकरीता नवीन वाहन खरेदीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. १५:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत शासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामाकरीता नियुक्त करणेबाबत मंजुरी देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, शासकीय /निमशासकीय सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत सामान्य प्रशासन विभाग, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. सीबीई १५२५/प्र. क्र. ३७/आस्थामं (का.१३), दि. १० जून, २०२५ नुसार तरतुद करण्यात आली आहे. या शासन निर्णयातील मुद्दा क्रं. अ मधील तरतुदी नुसार करार पध्दतीने "विवक्षित कामांसाठी" नेमणूका करताना पारदर्शक पध्दतीचा अवलंब करण्यात यावा. विहीत पध्दतीने जाहिरात देऊन "विवक्षित कामांसाठी" पात्र सेवानिवृत्त अधिका-यांकडून अर्ज मागविण्यात यावेत. जाहिरातीमध्ये नामिकासुचीत नियुक्त करावयाच्या एकुण व्यक्तिंची संख्या, विवक्षित कामाचे स्वरूप, कालावधी आणि देय मासिक पारिश्रमिक यांचा उल्लेख करण्यात यावा आणि प्राप्त अर्जातून पात्र उमेदवाराची निवड करून नामिकासुची नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांनी तयार करावी असे नमुद आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या आर्थिक वर्षाचे लेखे, वार्षिक अर्थसंकल्प, वस्तु व सेवाकर व आयकर विषयक कामकाज, गुंतवणुक व ठेवी, अंतर्गत लेखापरिक्षण, उपकर वसुली, जमा रक्कम ताळमेळ इत्यादी कामे, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व सर्व जिल्हा कार्यालयांमध्ये इमारत व इतर बांधकाम कामगारांची नोंदणी, नोंदित बांधकाम कामगारांचे नूतनीकरण आणि नोंदित बांधकाम कामगारांना कल्याणकारी योजनांच्या लाभाचे वाटप करणेकरीता संबंधित कामे करण्यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही. यापूर्वीच्या जाहिरातीच्या अनुषंगाने पदे भरण्यात आली होती. सदर मुदत दि.३१.०१.२०२६ रोजी संपुष्टात येत आहे.

सबब, नव्याने करार पध्दतीने कर्मचारी वर्ग व महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून गट "अ" व "ब" मधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची मंडळ मुख्यालयात नियुक्तीसाठी मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील सेवानिवृत्त अवर सचिव व कक्ष अधिकारी, कामगार विभागातील कामगार उपायुक्त, सहायक कामगार आयुक्त, व सरकारी कामगार अधिकारी तसेच वित्त विभागातील (संचालनालय, लेखा व कोषागारे), लेखा अधिकारी, सहायक लेखा अधिकारी या पदावर प्रशासन/वित्त व लेखा विषयक कामकाजाचा अनुभव असणाऱ्या सेवानिवृत्त अधिका-यांची मंडळाच्या आस्थापनेवर सेवा करार पध्दतीने विवक्षित कामकाजाकरीता उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार शैक्षणिक पात्रता व अनुभव असणाऱ्या सेवानिवृत्त अधिका-यांची नियुक्तीची कार्यवाही करणेबाबत प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावास मान्यता होताच शासन

निर्णयातील तरतुदीनुसार आवश्यक कार्यपध्दती अवलंबुन पुढील ३ वर्षांकरीता कंत्राटी पध्दतीने अधिकारी नियुक्तीबाबत नामसुची तयार करुन त्याप्रमाणे नियुक्तीची कार्यवाही करण्यात येईल.

**ठराव क्र. ६३ (१५)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत शासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना सेवा करार पध्दतीने विवक्षित कामाकरीता नियुक्त करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

**अध्यक्ष**
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.१६:-** **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयामध्ये कार्यरत बाह्यस्त्रोत यंत्रणेव्दारे कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन शासन मान्यतेच्या अधिन राहून माहे नोव्हेंबर- २०२५ पर्यंत अदा करण्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्याबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.०५.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कामगार विभागाच्या अधिनस्त असलेल्या विविध कार्यालयासाठी बाहय यंत्रणेव्दारे मनुष्यबळ घेण्यासाठी मे. एस-२ इन्फोटेक इंटरनॅशनल लि. या संस्थेच्या नियुक्तीस दि.१४.०३.२०२३ व दि.०९.०५.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटीच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार संबंधीत संस्थेसोबत करारनामा करुन पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि. ३१.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये बाहय यंत्रणेकडून कामे करून घेण्यासाठी सेवापुरवठादार संस्थेचे/एजन्सीचे पॅनल नियुक्ती करणेबाबतचा दि.०६.०९.२०२३ शासन निर्णय रद्द करण्यात आलेला आहे. तथापि, शासन निर्णय मधील मुद्दा क्र.०३ मध्ये "ज्या शासकीय विभागीय/ कार्यालयांनी या विभागाच्या दि.०६.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयाच्या आधारे मुनष्यबळाच्या सेवा घेतल्या असतील त्या विभागांनी/कार्यालयांनी दि.२१.१०.२०२३ पासून ९ महिन्याच्या आत मनुष्यबळाच्या सेवा प्रशासकीय कामकाजावर परिणाम होणार नाही, अशा रितीने संपुष्टात आणाव्यात असे नमुद आहे."

सबब, वरील तरतुदीनुसार दि.२१.०७.२०२४ रोजी उक्त नमुद ९ महिन्याचा कालावधी संपुष्टात आला आहे. मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय पातळीवरील मंडळ कामकाजाचे स्वरुप व व्याप्ती, मनुष्यबळाची आवश्यकता पाहता नवीन संस्था निश्चित होईपर्यंत सद्यस्थितीतील संस्थेस पुढील ३ महिन्याकरीता मुदतवाढ देण्याबाबत मा. मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांच्या मान्यतेने दि.१८.०७.२०२४ व दि.०४.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

मंडळाचे दि.०९.१०.२०२४ रोजीच्या बैठकीतील ठरावान्वये मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयामध्ये कार्यरत बाह्यस्त्रोत यंत्रणेव्दारे नियुक्त कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन शासन मान्यतेच्या अधिन राहून माहे मार्च, २०२५ पर्यंत अदा करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

मंडळ कामकाजाकरीता कंत्राटी पध्दतीने कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे आवश्यक असल्याने सदर पदे भरण्याकरिता ई-निविदा पध्दतीने संस्था निश्चितीबाबत मंडळाच्या दि.२६.०३.२०२५ रोजीच्या मंडळ बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आलेला आहे.

**ठराव क्र.६२ (१६)/२०२५:** - महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय स्तरावर मंडळ कामकाजाकरीता एकुण ५२९ इतकी पदे बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत कंत्राटी पध्दतीने भरणे करीता मंडळ स्तरावरुन ई- निविदा पध्दतीने संस्था निश्चिती करणेबाबत मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

शासनाच्या दि.१०.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कामगार विभागाअंतर्गत कार्यालयासाठी कंत्राटी कर्मचाऱ्याच्या नियुक्तीकरीता ई-निविदा पध्दतीने संस्था निश्चीत करण्यास मंडळास निर्देशित करण्यात आले होते त्याअनुषंगाने ई-निविदा मागविण्याची जाहिरात दि.१७.०९.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

सबब, नव्याने संस्था निश्चित होऊन मनुष्यबळ नियुक्तीस लागणारा कालावधी पाहता सद्यस्थितीत कार्यरत मनुष्यबळाचे वेतन माहे ऑक्टोबर २०२५ पर्यंत नियुक्त संस्थेस अदा करण्याचे प्रस्तावित आहे.

**ठराव क्र. ६३ (१६)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयामध्ये कार्यरत बाह्यस्त्रोत यंत्रणेव्दारे कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन शासन मान्यतेच्या अधिन राहून माहे नोव्हेंबर- २०२५ पर्यंत अदा करण्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.१७:- माहे मे, २०२५ या कालावधीत आयोजित भुवनेश्वर येथील व लंडन येथील अभ्यास दौऱ्यास मान्यता देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. मंत्री कामगार (कामगार) यांच्या नेतृत्वाखालील मा.प्रधान सचिव (कामगार), मंडळाचे मा.सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपसचिव कामगार विभाग, मा.मंत्री यांचे सचिव व विशेष कार्य अधिकारी, तसेच केपीएमजी सल्लागार या ७ सदस्यांच्या पथकासह १४ ते १६ मे २०२५ दरम्यान भुवनेश्वर येथे प्रशासकीय दौरा आयोजित करण्यात आला होता.

मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांच्या कौशल्य वृध्दीकरण प्रशिक्षणासाठी महाराष्ट्रात कौशल्य वृध्दीकरण संस्था उभारणी करण्याचे प्रस्तावित असल्याने ओडीसा येथील कौशल्य विकास संस्थेचा अभ्यास करण्याकरीता माहे, मे-२०२५ मध्ये अभ्यासदौरा आयोजीत करण्यात आला होता. त्याअनुषंगाने मा. मंत्री (कामगार) यांच्या नेतृत्वाखाली कामगार विभागातील प्रतिनिधींसह लंडन येथे अभ्यास दौरा आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

**ठराव क्र. ६३ (१७)/२०२५:-**

**माहे मे, २०२५ या कालावधीत आयोजित भुवनेश्वर येथील व लंडन येथील प्रस्तावित अभ्यास दौऱ्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.१८ :- वंसतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाअंतर्गत पैलवान कै. मारूती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळाअंतर्गत नोंदीत व्यक्तीची बांधकाम कामगार म्हणून मंडळात नोंदणी करण्यास मान्यता देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २ डी मध्ये इमारत व इतर बांधकामाची व्याख्या नमूद करण्यात आलेली आहे. दि.१८.०८.२०१७ रोजीच्या शासन अधिसुचनेअन्वये इमारत व इतर बांधकामाच्या अधिनियमातील व्याख्येव्यतिरीक्त इतर २१ कामांचा समावेश बांधकामाच्या व्याख्येमध्ये करण्यात आला असून सदर २१ कामांमध्ये " दगड कापणे, फोडणे व दगडाचा बारीक चुरा करणे" या कामांचा समावेश करण्यात आला आहे.

इतर मागास बहुजन कल्याण विभागातील वंसतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ अंतर्गत पैलवान कै. मारूती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ गठित करण्यात आले असून त्यामार्फत वडार समाजातील व्यक्तींना २५% बीज भांडवल कर्ज योजना, रू. १.०० लक्ष थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना राबविण्यात येत आहे. त्यापैकी २५% बीज भांडवल कर्ज योजना व रू. १.०० लक्ष थेट कर्ज योजना ऑफलाईन पध्दतीने संबंधित विभागाच्या जिल्हा कार्यालयामार्फत राबविण्यात येत आहे. व उर्वरीत दोन योजना (वैयक्तिक कर्ज परतावा योजना व गट कर्ज व्याज परतावा योजना) ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येतात.

सदर योजनांचा लाभ घेण्याकरीता महामंडळामार्फत स्वतंत्र नोंदणीचे व्यवस्था नसून योजनेचा लाभ घेण्याकरीता वडार समाजातील व्यक्तीने योजनांच्या निकषानुसार कागदपत्र सादर केल्यावर कागदपत्रांची तपासणी, व्यवसाय स्थळांची पाहणी इ.बाबींच्या पुर्ततेअंती मंजुर निधीच्या उपलब्धेनुसार निधी अर्जदाराच्या खात्यावर वर्ग करण्यात येतो. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.१८.०८.२०१७ रोजीच्या अधिसुचनेतील २१ कामांच्या यादीत "दगड कापणे, फोडणे व दगडाचा बारीक चुरा करणे" या कामांचा समावेश असल्याने सदर मंडळाकडे योजनेचा लाभ घेतलेल्या व्यक्तींना पैलवान कै. मारूती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळाने जर मागील वर्षभरात त्यांनी " दगड कापणे, फोडणे व दगडाचा बारीक चुरा करणे" या व्यवसायात किमान ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्रासह यादी उपलब्ध करून दिल्यास सदर कामगारांची नोंदणी मंडळाअंतर्गत करण्यात येऊन त्यांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजनांचा लाभ देण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळाल्यास इतर मागास बहुजन कल्याण विभागास तसा प्रस्ताव सादर करण्याचे प्रस्तावित आहे.

ठराव क्र. ६३ (१८)/२०२५:-

वंसतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाअंतर्गत पैलवान कै. मारूती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळाअंतर्गत नोंदीत व्यक्तीची बांधकाम कामगार म्हणून मंडळात नोंदणी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.१९ :- **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विस्तारीत कार्यालयासाठी मे. जॉली मेकर ०१ प्रिमायसेस कॉ. हॉ. सोसायटी लि. यांचेकडील नरीमन भवन, कुलाबा येथील भाडेतत्वावर घेतलेल्या जागेच्या ०३ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढीस मान्यता देणे.**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे मा.अध्यक्ष तथा मा. मंत्री (कामगार) यांचे मंत्रालयीन कार्यालय, चर्चगेट आणि मंडळ मुख्यालय वांद्रेकडील कामकाजामधील सुलभता व गतीमानता येण्यासाठी मे. जॉली मेकर ०१ प्रिमायसेस कॉ. हॉ. सोसायटी लि. यांचेकडील नरीमन भवन, कुलाबा येथील आठव्या मजल्यावरील १५६० चौ.फूट कार्यालय तीन वर्षाकरीता (०१/२०२३ ते १२/२०२५) मंडळाचे विस्तारीत कार्यालय खालील तक्त्यात नमूद दराने भाडे तत्वावर घेणेसाठीचा करारनामा करण्यात आला होता.

| License Period | License Fees Per Month |
|---|---|
| १st Year (From ०१.०२.२०२३ to ३१.१२.२०२३) | Rs.३,७४,४००/- plus GST |
| २nd Year (From ०१.०१.२०२४ to ३१.१२.२०२४) | Rs.३,९३,१२०/- plus GST |
| ३rd Year (From ०१.०१.२०२५ to ३१.१२.२०२५) | Rs.४,१२,७७६/- plus GST |

त्यानुसार मा.अध्यक्ष तथा मा.मंत्री (कामगार) यांचे मंत्रालयीन कामकाज (माहे फेब्रुवारी-२०२३ पासून) सदर कार्यालयातून सुरु करण्यात आले. सदर करारानुसार मंडळाकडून मे. जॉली मेकर्स कॉ.ऑ सो.मुंबई यांचेकडे एकूण रक्कम रु.२२,४६,४००/- सुरक्षा अनामत स्वरुपात दि.२३.१२.२०२२ रोजी जमा करण्यात आली. उपरोक्त नमूद भाडे करारनाम्यातील (Leave & License) दि.११.०१.२०२३ च्या अट क्र. ४ नुसार मासिक परवाना शुल्क महिन्याच्या १० तारखेपर्यंत मे. जॉली मेकर्स कॉ.ऑ सो.मुंबई यांना माहे सप्टेंबर-२०२५ पर्यंत विहित मुदतीत अदा करण्यात आले आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे मा.अध्यक्ष तथा मा.मंत्री (कामगार) यांचे कार्यालयाची मे. जॉली मेकर ०१ प्रिमायसेस कॉ. हॉ. सोसायटी लि. यांचेकडील नरीमन भवन, कुलाबा येथील आठव्या मजल्यावरील सद्यस्थितीतील भाडे तत्वावरील जागेच्या **भाडे करारनाम्यातील (Leave & License) अट क्र.०२ मध्ये "In Consideration of the License fee herein reserved and contained & Relying on the representations/ Commercial bid filled or made to the Licensee & Believing the same to be true the Licensor doth hereby grants the Licensee a License to use and occupy the said Premises only for the bona fide office purpose initially valid for the period of**

**36 (Thirty Six) months commencing from 05.01.2023 and expiring on 04.01.2026 and may be renewed thereafter as per mutual agreed terms by both the parties" असे नमूद आहे.** सदर करारनामा माहे डिसेंबर २०२५ अखेर संपुष्टात येणार असल्याने मंडळाचे मा.अध्यक्ष तथा मा.मंत्री (कामगार) यांचे मंत्रालयीन कार्यालय, चर्चगेट (नरीमन भवन) आणि मंडळ मुख्यालय वांद्रेकडील कामकाजामधील सुलभता व गतीमानता येण्यासाठी सदर भाडेकरारास पुढील ०३ वर्षे कालावधीकरीता मुदतवाढ देणे प्रस्तावित आहे.

सबब, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे मा.अध्यक्ष तथा मा.मंत्री (कामगार) यांचे कार्यालयासाठी मे. जॉली मेकर ०१ प्रिमायसेस कॉ. हॉ. सोसायटी लि. यांचेकडील नरीमन भवन, कुलाबा येथील भाडेतत्वावर घेतलेल्या जागेचा करार कालावधी माहे डिसेंबर २०२५ अखेर संपुष्टात येणार असल्याने संबंधितांशी केलेल्या भाडे करारनाम्यातील (Leave & License) अट क्र.०२ नुसार सदर भाडेकरारास पुढील ०३ वर्षे कालावधीकरीता मुदतवाढ देऊन सदर जागा भाडेतत्वावर घेण्यासाठी मान्यता देणे प्रस्तावीत आहे.

**ठराव क्र. ६३ (१९)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विस्तारीत कार्यालयासाठी मे. जॉली मेकर ०१ प्रिमायसेस कॉ. हॉ. सोसायटी लि. यांचेकडील नरीमन भवन, कुलाबा येथील भाडेतत्वावर घेतलेल्या जागेच्या ०३ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

**अध्यक्ष**
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. २० मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने आयत्या वेळेचे विषय**